MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सोळावे/अंक २/फेब्रुवारी २०१५

## संपादकीय

### सर्जनाचे एक पाऊल पुढे

फेब्रुवारी २०१५ मध्ये इंग्लंडमधील लोकसभेच्या दोन्ही सभागृहांत पारित झालेल्या एका ठरावाने इंग्लंडमध्ये आणि जगात मोठी खळबळ उडवून दिली. तीन व्यक्तींच्या सहभागातून नवीन अपत्याला जन्म देण्याकरता देण्यात आलेल्या परवानगीचा तो ठराव होता. विज्ञानाच्या ज्ञात इतिहासामध्ये अशी घटना केव्हाच नोंदवली गेलेली नाही. सर्वसाधारणतः अपत्य हे आई आणि वडिलांचे गुणविशेष घेऊनच जन्माला येते. आईवडिलांच्या जनुकांच्या मिश्रणातूनच नवीन बाळ जन्माला येत असते. सुमारे ३०-४० वर्षांपूर्वी आईवडिलांच्या जननक्षम पेशी म्हणजे 'अंदुक' आणि 'रेतुक' यांचा शरीराबोहर संयोग घडवून नवीन गर्भ निर्माण करण्यात वैज्ञनिकांना यश आले. पण यामध्येही आई आणि वडील यांच्या जनुकांच्या मिश्रणातूनच नवीन गर्भ तयार होतो. प्रत्येक पेशीमध्ये 'प्रकला' (Nucleus) प्रमाणेच इतरही अनेक महत्त्वाचे घटक असतात. 'कलकणू' (Mitochondria) हा असाच एक महत्त्वाचा घटक. अन्नापासून पेशीला ऊर्जा पुरवण्याचे काम हा घटक करतो. प्रकलामध्ये जसे DNA चे तंतू असतात तसेच कलकणामध्येही DNA चे काही कण असतात. गर्भामध्ये आईवडिलांचे गुणविशेष मात्र फक्त प्रकलांतील DNA मधूनच येतात. पुढे प्रतिरूपण (Clonning) ही यशस्वी झाले, पण मानवामध्ये या प्रक्रियेतून गर्भ वाढवण्यास आजही बंदी आहे. नवीन शास्त्रीय प्रयोगात, दोन आया आणि एक वडील अशा तीन व्यक्तींच्या मिश्रणातून नवीन गर्भ तयार करण्यात वैज्ञानिकांना यश आले आहे. जेव्हा आईवडिलांच्या जननक्षम पेशींचे मीलन होउन गर्भ तयार होतो, तेव्हा आईकडूनच या 'कलकणां' (Mitochonitring) मधील DNA कणही गर्भात येतात. आईच्या पेशींमधील कलकणूंमधील DNA मध्ये अनेकवेळा जनुकोत्परिवर्तन (Mutation) होते, आणि असे बाधित कणही गर्भामध्ये येतात. यामुळे काही व्याधी निर्माण होतात किंवा अपत्य अल्पायुषी होते. या नवीन शोधामुळे अशा व्याधींपासून मुक्त अपत्य निर्माण करणे शक्य होणार आहे. ही एक क्रांतीच आहे. गेल्या ५० वर्षांत जैवविज्ञानात असे अनेक क्रांतीकारक प्रयोग यशस्वी झाले आहेत. यांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक परिणामांची चर्चा होणे गरजेचे आहे. नैसर्गिक आणि अनैसर्गिक गर्भनिर्मितीच्या नवीन प्रयोगांचा व्यापक आढावा घेणे म्हणूनच गरजेचे आहे.

सृष्टीमधील वनस्पती आणि मानवासकट सर्व प्राणी हे प्रजोत्पादन करू शकतात. लाखो वर्षांच्या या प्रवासामध्ये

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

अनेक वनस्पती, प्राणी हे उत्क्रांत होत गेले आणि या निसर्गसंघर्षात जे तगून राहिले नाहीत, ते नष्ट झाले. या विकासाच्या टप्प्यांना जोडणारा एक दुवा असून त्याची उकल डार्विनच्या उत्क्रांतिवादाने केली. या शृंखलेमधील अनेक वनस्पती किंवा प्राणी हे नष्ट झाले असले तरी ते जीवाश्म स्वरूपात मिळतात आणि म्हणूनच विकासातील या कच्च्या दुव्यांवर (Missing Links) प्रकाश पडतो.

सर्वसाधारणपणे प्रगत उत्क्रांत प्राण्यांमध्ये 'नर' आणि 'मादी' यांच्या संयोगातून प्रजोत्पादन होते. ही नैसर्गिक प्रक्रिया जरी माणसाला माहीत असली; आणि ती तो जगत असला, तरी त्यामागील विज्ञान त्याला गेल्या काही शतकांतच ज्ञात झाले. बहुतेक सर्व प्राणी हे बहुपेशी असतात. या पेशींची माहिती, रचना आणि अस्तित्व यांची जाणीवच आधुनिक विज्ञानाला सतराव्या-अठराव्या शतकात झाली. रॉबर्ट हुक (Robert Hooke) यांनी १६६५ च्या सुमाराला अत्यंत बाळबोध 'सूक्ष्मदर्शक' यंत्र तयार करून या पेशींची माहिती मायक्रोग्राफिया (Micrographia) या आपल्या पुस्तकात नोंदवून ठेवली. अर्थातच ही माहिती अतिशय प्राथमिक स्वरूपाची होती. अंतोन वॅन लुवेनहॉक (Antonie van Leeuwenhoek) यांनी 'प्रगत' सूक्ष्मदर्शक यंत्र बनविले आणि त्यांना पेशींमधील हालचाल प्रथमच दिसली. ह्या पेशी सजीव असल्याचे त्यांनी, ९ ऑक्टोबर १६७६ रोजी लंडनच्या रॉयल सोसायटीला पत्र लिहून कळविले. लाल रक्तपेशीही त्यांनी बघितल्या आणि त्यांचे वर्णन करून ठेवले. त्यांचा सर्वांत महत्त्वाचा शोध म्हणजे, पुरुषाच्या वीर्यामधील 'प्रजननक्षम पेशी' म्हणजे 'रेतुके' बघितल्याची त्यांची नोंद. त्यांच्या या शोधामुळे प्रथमच प्रजोत्पादन हे स्त्री आणि पुरुषांच्या प्रजननक्षम पेशी म्हणजे 'गंतुकांमुळे' (Gamets) होते याची जाणीव शास्त्रज्ञांना झाली. रॉबर्ट हुक यांनीही त्यांच्या निरीक्षणाला संमती दर्शविली. तरीही हे पेशीशास्त्र विकसित होऊन त्याचा 'पेशीसिद्धान्त' बनविण्याचे श्रेय मात्र थिओडोर श्वान (Theodor Schwann), मथियास जेकब श्लेडेन (Matthias Jakob Schleiden) आणि रुडॉल्फ व्हर्चो (Rudolf Virchow) यांच्या १८४०/१८५० च्या सुमाराला केलेल्या संशोधनाला जाते. या क्षेत्रामधील पुढची क्रांती म्हणजे 'वीजक विज्ञानाच्या' (Electronics) साहाय्याने तयार केलेले सूक्ष्मदर्शक यंत्र. स्त्री आणि पुरुष गंतुकांचा आजचा सगळा सरमिसळीचा खेळ हा या सूक्ष्मदर्शक यंत्राच्या क्रांतीमुळेच शक्य होत आहे. १९२० साली हे सूक्ष्मदर्शक यंत्र मोठ्या प्रमाणावर वापरात आले.

सर्व सजीवसृष्टी जशी पेशींनी बनलेली आहे तसे सर्व पदार्थ हे अणुरेणूंनी बनलेले आहेत हेही विज्ञानाला उमगलेले होते. १९०५ साली मॅक्स प्लँक (Max Planck) यांचा 'पुंजसिद्धान्त' (Quantum) आणि आइन्स्टाइन (Albert Einstein) यांचा १९०५-१९१५ सालचा 'सापेक्षतावाद' यांनी न्यूटनच्या परंपरागत भौतिकीला धक्के देत नवभौतिकीला जन्म दिला. यापुढील सर्व विज्ञानाचा प्रवास आणि शोध हे याच सिद्धान्तांवर आधारित आहेत.

वनस्पती आणि पदार्थविज्ञानशास्त्राच्या प्रगतीला या तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे फार मोठा हातभार लागला. भौतिकीमधील नवीन तंत्रज्ञान जीवशास्त्राच्या (Biology) संशोधनाकरता उपलब्ध झाले. ह्याचा सर्वांत मोठा फायदा हा वैद्यकशास्त्राला

(पृष्ठ क्र. ३९ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सोळावे / अंक २ / फेब्रुवारी २०१५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | यिंचुआन विज्ञान केंद्र | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | स्नेहसंमेलन ते विश्वसंमेलन | सौ. सुमेधा वि. बेडेकर | ५ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : १३) | श्री. अरविंद ओक | ९ |
| ५) | व्यक्तीवेध-३: राजा भर्तृहरी | श्री. नरेंद्र गोळे | १२ |
| ६) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १६ |
| ७) | पाऊले चालती...एक जीवनानुभव | श्री. मा. य. गोखले | २३ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | २९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# यिंचुआन विज्ञान केंद्र
## (Yinchuan Science Centre)

*चीनमधील यिंचुआन शहरातील विज्ञान केंद्राविषयी माहिती विशद करणारा लेख - संपादक*

चीनमधील २७ व्या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन यिंचुआन शहरातील प्रदर्शन आणि संमेलन केंद्रात (Exhibition and Conference Centre) मध्ये केलेले होते. या केंद्राच्या जवळच विज्ञान केंद्र आहे. विज्ञान केंद्राची भव्य इमारत आणि त्याच्यापुढे बांधलेली घुमटाकार इमारत आपले लक्ष वेधून घेते. हे कायआहे याची आम्ही चौकशी केली तेव्हा आमच्या साहाय्यकाने त्याची थोडक्यात माहिती दिली. आमची बस मात्र थोडी पुढे जाऊन प्रदर्शन केंद्राच्या द्वारापाशी उभी राहिली. बसमधील साहित्य घेऊन आम्ही प्रदर्शनास्थळी पोहोचलो. त्या दिवशीचा सकाळचा वेळ प्रकल्प लावण्यासाठी राखून ठेवला होता. आपण जर आपला प्रकल्प लवकर सज्ज केला तर आपल्याला विज्ञान केंद्र पाहता येईल या आशेने आमची सर्व कामे आम्ही लगबगीने आटोपली. आयोजकांची परवानगी घेऊन आम्ही विज्ञान केंद्राकडे निघणार तेवढ्यात सर्व जण तिकडेच जात आहेत असे आमच्या लक्षात आले. त्यांच्यासोबत आम्हीही विज्ञान केंद्रात प्रवेश केला.



**विज्ञान केंद्राची भव्य इमारत**

जगात वेगवेगळ्या ठिकाणी विज्ञान केंद्रे उभारली गेलेली आहेत. त्यातल्यात्यात घुमटाकार आकार असलेले विज्ञान केंद्र फारच प्रसिद्ध झालेले आहे. काही ठिकाणी त्याचा वापर तारांगणासाठी. काही ठिकाणी तर काही विशिष्ट प्रदर्शनीय वस्तू ठेवण्यासाठी करतात. येथे मात्र त्याचा वापर शोभेसाठी केलेला आहे. मुख्य विज्ञान केंद्र जवळच असलेल्या एका प्रशस्त इमारतीत आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्याबरोबर या केंद्राचा भव्यपणा जाणवतो. अनेक प्रकारच्या प्रदर्शनीय वस्तू येथे ठेवलेल्या आहेत. परंतु समोरच स्पष्टपणे दिसणारी उंच उंच क्षेपणास्त्रे आपले लक्ष वेधून घेतात. अंतरिक्ष संशोधनात चीनने चांगलीच आघाडी घेतलेली आहे. अंतराळात उपग्रह स्थापित करण्यासाठी लागणारी क्षेपणास्त्रे त्यांनी बनविलेली आहेत. त्यांतील काही क्षेपणास्त्रांच्या प्रतिकृती येथे ठेवण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर जमिनीवर आपटलेल्या अनेक उल्कांपैकी काही उल्कांचा शोध घेऊन त्यादेखील काचेच्या बंद कपाटात ठेवलेल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी त्या अशनींची थोडक्यात माहिती दिलेली आहे.





**अग्निबाणांच्या प्रतिकृती**

पृथ्वीबद्दलची माहिती देणारे एक वेगळे दालन येथे आहे. या दालनात पृथ्वीची सध्याची स्थिती, त्याचबरोबर जुन्या काळातील पृथ्वीवरच्या खंडांची स्थिती दाखविली आहे. या खंडांच्या हालचालीमुळे कोणते परिणाम होतात याचीही माहिती तेथे देण्यात आलेली आहे. खंडांची

हालचाल झाल्याने पृथ्वीला भूकंपाचे धक्के बसतात. विशेषत: जेथे खंड एकत्र येतात तेथे हा धोका संभवतो. या दृष्टीने विचार करता निक्शिया प्रांतच मुळी धोक्याच्या ठिकाणी वसलेला आहे याची माहिती केंद्रात देण्यात आलेली आहे. त्याचबरोबर या प्रांतात आढळणाऱ्या वनस्पती, प्राणी, येथील खनिजे यांची माहिती देण्यासाठी व्यवस्था केलेली आहे. वेगवेगळ्या खनिजांचे नमुने ठेवलेले आहेत. यात उल्लेख करण्यसारखी बाब म्हणजे ॲल्युमिनिअम आणि लोखंड या दोन धातूंच्या बाबतीत खनिजावर प्रक्रिया करून शुद्ध स्वरूपात धातू कसा मिळवितात याच्या पायऱ्या स्पष्ट करून दाखविल्या आहेत. त्यामुळे धातूचा तुकडा वाया घालविताना पुन्हापुन्हा विचार करण्याची बुद्धी होते.





**ॲल्युमिनिअमचे खनिज आणि त्यापासून मिळविलेले शुद्धॲल्युमिनिअम**

विज्ञान केंद्रातील सर्वांत लक्ष वेधून घेणारे प्रदर्शन म्हणजे फुलपाखरांचे. परिसरात आढळणाऱ्या अनेक फुलपाखरांना पकडून त्यांना वाढवून पद्धतशीपणे पेटीत लावून ठेवलेले आहे. अशा प्रकारच्या अनेक पेट्या क्रमाने ठेवल्याने एकूणच परिसर सुंदर दिसतो. त्यांतील काही चित्रे खाली दिलेली आहेत. फुलपाखरांप्रमाणेच लक्ष वेधून घेणारे आणखी एक दालन म्हणजे रोबोटच आहे. येथे अनेक प्रकारचे रोबोट ठेवलेले आहेत. त्यांतील काही शल्यक्रिया करणारे, काही कारखान्यात काम करणारे तर काही संगीतवाद्ये वाजवणारे आहेत. रोबोट या मूळ शब्दाचा अर्थ गुलाम असा आहे. मानवाने या यंत्राचा खरोखरच गुलामासारखा वापर केलेला असल्याची जाणीव हे प्रदर्शन पाहून होते.



**फुलपाखरांचे वेगवेगळे नमुने**

स्वयंचलित वाहने हा आणखी एक विभाग पाहण्यासाखा आहे. वाहनाचे वेगवेगळे भाग सुटे करून ते कोणते काम करतात याची माहिती दिलेली आहे. वेगवेगळ्या यंत्रात किती प्रकारचे नट बोल्ट वापरतात याचेही प्रदर्शन मांडलेले आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारचे बॉलबेअरिंग कसे असतात याचीही माहिती आपल्याला या केंद्रातून मिळते. माहिती क्रांती ही विसाव्या शतकाची मोठी देणगी आहे. यातील वेगवेगळे घटक कसे काम करतात याची माहिती देणारे एक वेगळे दालन आहे. रेडिओ, दूरचित्रवाणी तसेच संगणक यांचे कार्य कसे चालते याची जुजबी माहिती येथे आपल्याला मिळते. एका ठिकाणी तर कॅमेराच ठेवलेला आहे. तेथे उभे राहिल्यावर आपलेच चित्र दूरचित्रवाणी संचात दिसते. त्या ठिकाणी प्रत्येकालाच टीव्ही स्टार बनण्याची इच्छा असल्याने जरा गर्दी होते. या गर्दीतदेखील मी माझे चित्र काढून घेतलेच.

(पृष्ठ क्र. ८ वर)

---

अगदी सरळमार्गी असणे हेही एक प्रकारचे पापच आहे. हे पाप कालांतराने मनुष्याच्या दुर्बलतेचे कारण बनते. -स्वामी विवेकानंद

# स्नेहसंमेलन ते विश्वसंमेलन

*शालेय जीवनातील स्नेहसंमेलनाची महती सांगणारा व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारा लेख - संपादक*

दोन-तीन शाळांच्या स्नेहसंमेलनांना जाण्याचा योग आला, त्यांत थोडासा सहभागही घेता आला. बहुतेक ठिकाणी सध्याच्या गाजलेल्या प्रार्थनेने 'तू बुद्धी, तू तेज दे, नव चेतना विश्वास दे' सुरुवात झाली. हे हल्लीचे चिरतरुण गीत आहे. त्यामुळे हे अपेक्षितही होते. काही वर्षांपूर्वी या संमेलनास ''शारदोत्सव'' हे नाव असे. ''शारदा'' म्हणजे या विश्वात एक अत्यंत सूक्ष्म आणि शुद्ध अशी जी शक्ती आहे ती देवता आणि गणेश म्हणजे विद्या, ज्ञान प्राप्त करून देणारे दैवत. शारदेच्या रूपाने ते ज्ञान कलेच्या माध्यमातून व्यक्त होते. ज्या वेळी माझ्यावर दोन शब्द सांगण्याची वेळ आली तेव्हा लहान मुलांना संगीताच्या माध्यमातून गुंफून सांगण्याचा प्रयत्न केला. या संमेलनाचा मूळ उद्देशच मुळी ''आनंदाचा मळा'' फुलवायचा असतो. ठेका, सूर, शब्द, अर्थ या माध्यमातून लहान मुलांपासून ते मोठ्या मंडळींपर्यंत आणि स्वतःला विसरून अगदी समाधानात ईश्वरापर्यंत पोचू शकतो. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि इतर कार्यकर्ते एकत्र येण्यामागचा हेतू ''स्नेह'' म्हणजेच आपुलकी, प्रेम वृद्धिंगत होणे अपेक्षित असते. पाहा बरं नाट्यसंगीत, परमेशाची लीला-

पहा बरं परमेशाची लीला,
जये उभविली, नवलाईची, जगन् नाट्यशाला॥धृ॥
वरती शोभे विशाल अंबर,
बिन खांबाचा घुमट मनोहर,
खाली हिरवी-हिरवी चादर, सुंदर वनमाला॥१॥
या गगनाच्या नील छतावर,
चमकदार चंद्राचे झुंबर,
कोटी-कोटी तारका चमकती, जणू दीपमाला॥२॥

परमेशाची लीला मुलांनो, एवढे मोठे आकाश, पण खांबाशिवाय कसं बरं उभं आहे? कुठल्या शक्तीनं एवढं मोठं अवकाश धरून ठेवलंय? ही न दिसणारी ''शक्ती'' जी सर्वत्र, चराचरात पसरली आहे. या विश्वातच आपणही आहोत आणि त्यामुळे ही ''शक्ती'' आपल्यातही भरलेली आहे. या शक्तीला वेगवेगळ्या रूपांत बघण्याचे काम आपण या स्नेहसंमेलनांतून करतो. ही शारदेची शक्तीच आपण हसत-खेळत अनुभवतो. लहानपणी शारदोत्सवांत छान-छान सजायचं, भरपूर मेकअप करायचा; नाच, गाणी, नाटक, स्पर्धा, चित्रकला, बक्षीस, खेळ अशा विविध कार्यक्रमांतून भाग घ्यायचा आणि शाळेच्या सुट्टीची लगेच वाट बघायची. डोळ्यांपुढे चित्र तरळते ५७ च्या समराचे, रायगडाला जेव्हा जाग येते, माता न तू वैरिणी अशा नाचगाण्यांपासून, नाटकांपासून ते मधुबन में राधिका नाचे रे, चाळ माझ्या पायांत, नाच रे मोरा, कुहु-कुहु बोले कोयलिया, जादूचे प्रयोग, रांगोळी, अनेक प्रकार असायचे. असा लहानपणचा शारदोत्सव आठवला. पालकांनी व शिक्षकांनी बसविलेले उत्तमोत्तम कार्यक्रम, प्रतिभाशाली कार्यक्रम व्हायचे. दूरदर्शन हे माध्यमच त्या वेळी नव्हते. सगळ्याचे आश्चर्य, कौतुक, मेहनत, उत्साह, नवीन-नवीन संकल्पना, उत्तम दर्जा जपला जायचा. तसाच अनुभव या संमेलनांतूनही येत होता. ''कृष्ण दर्शन तो देंगे कभी ना कभी'' याची प्रचिती लहान बालगोपाळांच्या सहज, सुंदर हावभाव व हालचालींवरून त्यांच्या निरागस भावनेतून आली. कार्यक्रम चालू असताना टाळ्यांचा कडकडाट सुरु झाला. मजा म्हणजे

ज्या माणसाकडे चांगल्या विचारांचा भक्कम पाया नाही, त्याची आयुष्याची इमारत उभीच राहू शकत नाही.

प्रेक्षकवर्गाने टाळ्या वाजवल्यावर रंगमंचावरील मुलांनीही लगेच दाद दिली. सुंदर उद्यानात छान फुलं, रोपं डुलत होती. हातात हात घालून उड्या मारत होती. त्यांचे टवटवीत, निरागस डोळे, आपल्यालाही कितीतरी गोष्टी शिकवत होते. आपणही इतकं निर्मळ, निरागस, सात्त्विकतेत रोजचं आयुष्य शेवटपर्यंत 'स्नेहाने' फुलवू शकतो का? इथे निसर्गाचे सत्यानंदाचे स्वरूपच रंगमंचावर अवतरले होते. 'फुले' जशी सुगंध, सौंदर्य दाखवतात, तशीच ही छोटी-छोटी मुलं 'कले'च्या माध्यमातून आपले संस्कार, संस्कृती दाखवत होती. एखाद्या माळ्याप्रमाणे आपण मोठ्यांची भूमिका करत असतो आणि आपण कोणाचे कोण आहोत ही सर्व नातीही विसरुन जातो आणि स्वतःला विसरतो म्हणजेच आपण आनंदाचे डोही आनंद तरंग हे अनुभवत जगत असतो. दोन सत्य घटनांच्या लहान मुलांच्या गोष्टी आवर्जून सांगितल्या.

पहिली गोष्ट आहे कोकणातल्या एका छोट्या मुलाची, शंभर वर्षांपूर्वीची. तरीही या मुलास आपण सर्वांनी मोठेपणी व्यवहारांत बघितले आहे अशी गोष्ट. बघा, एक छोटा मुलगा कोकणात गोवळला, राजापूरजवळ राहत होता. चांगल्या सधन, सुशिक्षित कुटुंबात त्याचं बालपण मजेत चाललं होतं. घरचंच दूध, धान्य, शेती, आंब्याच्या बागा, पैसा-दागिने, नोकर-चाकर, पाहुण्यांचा राबता, घरातील पाच काका-काकू, पंधरावीस मुलं-मुली असं नातेवाइकांनीही भरलेलं घर. साखरेची गलबतं व कोळशाची वखार, मुंबईला पेढी, व्यापार इ. सर्व उत्तम चालले होते. पण हळूहळू व्यापार कमी-कमी होऊ लागला. व्यापारात बरीच खोट सोसावी लागत होती.आता घरात घेणेकरी, देणेकरी यांची आवक वाढली. त्यातच या पंधरा वर्षांच्या मुलाचे वडील, डायरियाने स्वर्गवासी झाले. घरातील कर्ता पुरुषच निवर्तल्यावर या संकटास तोंड देणे खूपच अवघड झाले. घरातील इतर मंडळी बरीचशी देणी फेडत होतीच, पण थोडेफार देणे तरी शिल्लक होते. काही वर्षांचा अवधी होता. वडिलांचा मृत्यू बघितल्यावर या मुलाने ''आपण डॉक्टरच व्हायचे'' आणि काही वर्षांच्या आतच शिक्षण पुरं करत असताना जमेल तसे या व्यापाऱ्यांचे पैसे फेडायचे. हे त्याने नक्की ठरवले होते. हा छोटा मुलगा दहावीनंतर आईने दिलेले रुपये पाच व थोरांचे आशीर्वाद घेऊन पुण्यातील ''विद्यार्थिगृहात'' राहावयास आला. पुढे L.C.P.S. होऊन डॉक्टर झाला. कष्ट आणि मेहनत, चिकाटी व अभ्यास या जोरावर पुढील सात-आठ वर्षांत सर्वांची देणी फेडली. पुढे या डॉक्टर मुलाने विवाह केला. आता त्यांचा संसार चालू झाला. सर्व दुःखावर सकारात्मक वृत्तीने मात करायची, यशश्री खेचून आणायची ही वृत्तीच झाली आणि कायम यशही मिळाले. डॉक्टरी व्यवसाय उत्तम सुरू झाला. त्यांची मुलगी पुढे शाळेत जाऊ लागली. एके दिवशी शाळेत गेले असताना त्या डॉक्टरांना आपली मुलगी एका गोठ्यासारख्या शाळेत शिकते हे पाहून खेद वाटला. नेमकी तिथेच शेजारी दोनच खोल्या असलेली एक अतिशय छोटी शाळा होती. त्या शाळेतील मंडळींनी या डॉक्टरांकडे व्यवस्थापनासाठी काही मदत मागितली. हे उत्साही डॉक्टरही तयार झाले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे आज आता आपण संमेलनासाठी ज्या वास्तूच्या प्रांगणात जमलो आहोत ही वास्तू म्हणजेच ती पूर्वीची गोठ्यातील शाळा होय. तेच हे डॉ. बेडेकर विद्या मंदिर आणि तो छोटा मुलगा जो पुढे डॉक्टर झाला, तो म्हणजे या शाळेचे संस्थापक डॉक्टर वासुदेव नारायण बेडेकर.

विद्या प्रसारक मंडळाचा विस्तार आता खरोखरी वटवृक्षासारखा वाढला आहे. इंजीनिअरिंग कॉलेजही आता परशुरामाच्या भूमीत उभे आहे. जिद्द, चिकाटी, प्रचंड परिश्रम, थोरांच्या शुभेच्छा, पुढील आयुष्यात उंच ध्येय आणि प्रत्यक्षात करून दाखविणे हे सर्व त्यांना परिस्थितीने शिकविले. शहर-गाव, श्रीमंत-गरीब, लहान-मोठा हे सर्व त्यांच्या दृष्टीने दुय्यम होते. मुळात आपला

सर्वांचा पहिला गुरू 'आई', नंतर विद्यार्थिदशेत असताना, पुढे शिक्षणाचा सोपान जीवनात चढताना आपले मार्गदर्शक शिक्षक व भारतीय महान ग्रंथ दासबोध, रामायण, महाभारत इ. आणि अंतिमतः सर्वश्रेष्ठ गुरू ''निसर्ग'', जो आपल्या जीवनात अतिशय प्रतीकात्मक आहे. उदा. 'पृथ्वी'- ती पृथ्वी स्वतःभोवती फिरता-फिरता सूर्याभोवती फिरत असते. तसेच आपण सर्व भगिनी संसारात स्वतःचा उद्धार, मार्गक्रमणा करत आपल्या कुटुंबाची, संसाराची प्रदक्षिणा करत असतो. वसंतऋतूत कैरीचा आंबा होतो. त्या वेळी कोकीळ पक्षी गात असतो. निसर्गात त्या कैरीचा तो आंबा होत असतो. हे एक प्रकारचे डोहाळजेवणच असते का हो? या छोट्या मुलाने परिस्थितीवर मात करून स्वतःचे जीवन घडवले. नंतर कुटुंब, गाव, शहर, देश अशी विचारसरणी, मनाचा परीघ वाढत जातो, मन मोठे होऊन आपोआपच चैतन्याचे वारे वाहू लागतात. मनाचे श्लोक, पाठांतर, चरित्रवाचन, भूगोल, इतिहास इ. सर्व संस्कार या विद्यार्थिदशेत आवश्यक असतात. सध्या ही छोटी मुलं आपला हात धरून चालतात, त्यांचा विश्वास, श्रद्धा आपल्यावर असते पुढे ही पिढी मोठी झाली की ती आपले भवितव्य घडवतील व आपण त्यांचा हात हातात घेऊन, त्याच स्नेहाने, त्याच प्रेमाने, आपुलकीने. आपल्या मातृभूमीची ही पिढी वैभव आहे, खरी समृद्धी आहे. या मुलांचे लहानपण जपण्यासाठी पालकांना 'पण' करावा लागतो आणि प्रथम लक्ष्मणरेषा स्वतःभोवती आखणे आवश्यक आहे. संस्कार सांगत बसण्यापेक्षा सुकृतीतून, स्वतःच्या वर्तनातून ते या पिढीस दिसले पाहिजेत. कारण ही छोटी मुलं प्रत्येक गोष्ट टीप कागदासारखी टिपत असतात. वृत्तपत्रांमधील अश्लील जाहिराती, ओंगळ प्रदर्शन, हिडीस नृत्य, उत्सवांचे व्यापारीकरण इ. परिस्थितीतून या भावी पिढीस कसे वाचवायचे? त्यांच्यासमोर कसले आदर्श ठेवायचे? मार्गदर्शक कसे व्हायचे? आणि मार्ग तरी कसा आखायचा? यासाठी पहिली सुरुवात आपली भारतीय कुटुंबपद्धती आणि शेवटी कर्तव्यदक्ष असणारे जबाबदार नागरिक ही जाणीव सातत्याने असणे आवश्यक आहे. सावधानता, कर्तव्य आणि ज्ञानाची गरज आहे. विज्ञान हे अंतिम सत्यापर्यंत पोहचू शकत नाही. रोजच्या व्यवहारांत ''प्रेमा'' चीच ओढ नात्यांप्रमाणे असावी लागते. आता दुसरी गोष्ट सांगते - एक पाच वर्षांचा मुलगा आईला प्रश्न विचारतो, ''आई ,अमृत म्हणजे काय? तू मला का कधी दिले नाहीस?'' याचे उत्तर बघूयात. एका सुशिक्षित आजीने केलेल्या गीतातून - ''अमृत म्हणजे काय?'' ते बघू.

**अमृत म्हणजे काय?**

अमृत म्हणजे काय पेय हे, सांग मला तूं आई,
दादा-ताई म्हणती मजला मिळणारच ते नाही ॥धृ॥
तयार करण्या कल्पतरूंचे पुष्प करी धरती,
मृगजळांतले जीवन आणूनी स्वर्गपऱ्या बनविती,
नवरस मंथुनी नवनीत मधु हे, रंगे इंद्रधनुंनी,
चांदण्यातल्या शीतलतेवर चमके सौदामिनी,
तेजस्वी हे अमृत असले, मजला कळतची नाही,
कधी असले हे मधुरामृत तूं दिधले मजला नाही ॥१॥
अमृत म्हणजे काय?

आईला मग उत्तर नव्हते विस्मयजन झाली
स्वर्गीय अमृत बघण्यासाठी सर्वच उत्सुकली,
कंठ दाटला भरुनही आले माय अबोली होई,
माता असूनही समर्थ नाही देण्यास्तव आई,
मातृत्वाला बोचबोचली शल्य मनी रुतले,
बाळाच्या ह्या प्रश्नानेही हृदय जणू फुटले ॥२॥
अमृत म्हणजे काय?

खिन्न मायही देखुनी ऐसी बाळही गहिवरला,
धावत-धावत मिठी मारिली जागृत ममतेला,
बाळाचे ती चुंबन घेई, वात्स्यल्यची स्फुरले,
आनंदाच्या गंगेमध्ये अमृत सापडले,
ब्रह्मानंदी तरंग उठती संतोषाचे बोल,
न-मृत होती म्हणून बदती अमृत फार अमोल,
अमृतसिद्धी झाली येथे कृतार्थ सर्वही झाले,
बाळालाही उत्तर कळले, अमृत पाझरले ॥३॥

आई म्हणजे आ=आकाश व ई=ईश्वर. आकाशालाही गवसणी घालून उरतं ते आई व बाळाचं स्वर्गीय प्रेम. तसेच ईश्वर व भक्ताचे आणि निसर्ग व मानवाचे हे नाते अतूट आहे. अन्न, वस्त्र, निवारा सर्व काही भरभरून निसर्ग आपल्याला देतोय. सर्वांना कृतज्ञतेने वंदन करून सध्याच्या दलदलीच्या परिस्थितीतूनही सुंदर ''कमळ'' फुलवायचा प्रयत्न आपण करू यात. ''तिळगूळ घ्या, गोड बोला.''

आपली भारतीय संस्कृती ही निसर्गपूजक आहे. हा निसर्ग पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांनी मिळून बनला आहे. संक्रांतीला आणि विशेषतः रथसप्तमीला आपण सूर्याचे पूजन करतो. सूर्य हा तेजोगोल असल्यामुळे हे पूजन म्हणजे तेजतत्त्वाचे पूजन आहे. आपले पृथ्वीवरील जीवन हे सर्वस्वी सूर्याकडून मिळणाऱ्या तेजावर आणि उष्णतेवर अवलंबून आहे. संक्रांतीला आकाशात पतंग उडवून आपण जणू आकाशातील सूर्याचे स्वागत करतो. संस्कृतमध्ये सूर्याला पतङ्ग हे नाव आहे. पतंग हा शब्द पत् म्हणजे उडणे या धातूपासून आला आहे. सूर्य जणू पक्ष्याप्रमाणे आकाशात उडतो. तसेच सु-घट या संस्कृत शब्दावरून सुगड हा शब्द आलेला आहे. माती हे पंचमहाभूतांपैकी 'पृथ्वी' या तत्त्वाचे प्रतीक आहे. या पृथ्वीवरच आपले जीवन अवलंबून असते. अन्न, वस्त्र, निवारा पृथ्वी देते. तेव्हा ही आपली माताच आहे. सुगडाचे पूजन म्हणजे मातेचे पूजन. तिळाच तैल म्हणजे तेल आणि संस्कृतमध्ये तेलाला 'स्नेह' म्हणतात. गुळातून गोडवा देतो. या दिवशी आपापसातले स्नेह वृद्धिंगत करायचे, जसे आपण 'स्नेहसंमेलनाला' करतो आणि स्नेहसंमेलनातून सुरुवात करुन आता निसर्गातील विश्वसंमेलनाला आपण पतंग उडवून साद घालू यात-त्रिवार जयजयकार माते, त्रिवार जयजयकार!

म्हणा - भारत माता की जय !

**सौ. सुमेधा वि. बेडेकर**

(पृष्ठ क्र. ४ वरुन **यिंचुआन विज्ञान केंद्र**)



**दूरचित्रवाणी संचात आपलेच चित्र**

यिंचुआनच्या विज्ञान केंद्रात मुलांसाठी खास व्यवस्था केलेली आहे. वेगवेगळ्या प्रकारचे झोपाळे, घसरगुंड्या तेथे ठेवलेल्या आहेत. बागेत असावयाची उपकरणे या विज्ञान केंद्रात कशासाठी? असा प्रश्न आपल्याला पडतो. परंतु येथे या यंत्रांमागील विज्ञान स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. याखेरीज वेगवेगळी वैज्ञानिक खेळणी, साबणाचे फुगे, मनोरंजक आरसे यांची तर रेलचेलच आहे.



**खेळण्यांशी खेळताना एक चिनी मुलगा**

विज्ञान केंद्रात बघण्यासाखे खूप आहे. परंतु आमच्याकडे वेळ मात्र मर्यादित होता. ठरलेल्या वेळेत दुपारच्या भोजनासाठी हॉटेलला परत जायचे होते. म्हणून आमचे आयोजक आम्हांला शोधतच होते. त्यांनी बळेबळेच आम्हांला बाहेर काढले. पुन्हा कधीतरी येऊ असा विचार करून जड पावलांनी आम्ही विज्ञान केंद्राच्या बाहेर पडलो.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
काटई, ता. कल्याण जि. ठाणे - ४२१२०४

खूप कमी लोक आपल्या आयुष्यात सुख आणि आशीर्वाद घेऊन येतात, पण खूप जास्त लोक आपल्याला कटू अनुभव आणि शिकवण देण्यासाठी येतात.

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १३**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ४० वा. 'कानाबेडा - बखत गढ २२ कि.मी. सकाळी ६.०० ते ५.०० संध्या.**

'कानाबेडा' मुक्कामासमोरच टेकडी होती. हळूहळू चढ आणि टेकड्यांमधून जाणारा मार्ग ! थोडीबहुत शेती आजूबाजूला आहे त्यामुळे बावनगजा-पाटी रस्त्यासारखे उघडेबोडके व रूस वाटत नाही.

सकाळी आणि संध्याकाळी सातभाई पक्ष्यांचा फारच गेंगाणा गोंगाट चालतो. होले/कवडे, दयाळ, वेडा राघू, खंड्या, पांढरे बगळे, बुलबुल, शक्करखोरे, शिंपी पक्षी, पूर्वी पत्त्यांवर चित्रे असत ते पक्षी सतत भेटतात.

रस्त्याने दाट नाही तरी चांगली सावली होती. पुढेपुढे कडुनिंब, चिंचा जाऊन फक्त बाभळीच राहिल्या, पण उंच असल्याने छाया होती. त्यातून थंडी असल्याने उन्हाचा तडाखा नव्हता त्यामुळे आज भोजनाविना चाललो तरी त्रास झाला नाही. कवांट हे मोठे गाव. सौ. मंगलने तिथे नवे बूट घेतले. (नवी बॅटरी घेतली, ५० रु.) वाटेवर दोन ठिकाणी चहा आवर्जून दिला गेला. बखतगढाच्या अलीकडे चहा मागितला, मिळाला. नंतर कळले, गावात स्वाध्याय आहे; 'घरमंदिर' हा प्रयोग चालतो. ५५ घरे आहेत. प्रत्येक घरात योगेश्वर एक सप्ताह राहतो.

उसाला तुरे येतात तसे मक्यालाही तुरे येतात. कणसेही होती. भोजनाची वेळ टळली. वाटेत गाव लागलेच नव्हते. पुढे लागले तरी जेवलो नाही. बिस्किटे, चणे, शेंगदाणे यांवर भूक भागविली.

हाफेश्वर मंदिर टाळून आम्ही पुढे आलो याची शिक्षा तर नव्हे ही!

दक्षिण तटावर आम्ही नर्मदा मैय्यापासून जेवढे दूर गेलो तसे आदरातिथ्य, नर्मदे हरचे गुंजन कमी झाले होते. इथेही उत्तर तटावर नर्मदा १०/१५ कि.मी. दूर आहे, पण शहरे संपून खेडी लागल्यावर-विशेषतः गुजरातकडून मध्यप्रदेशकडे सरकताना-आदरातिथ्य वाढल्याचा अनुभव येतो. आबालवृद्धांकडून 'नर्मदे हर' म्हणून दखल घेतली जातेय.

कवांटा सोडल्यावर एक नदी लागली. पाणी फार नव्हते, पण त्यात मासे दिसले. तापी नदीच्या कालव्यांमध्ये एकही मासा दिसला नव्हता; फक्त काही ठिकाणी, साचलेल्या पाण्यावर, जलपृष्ठावरून फिरणारे कीटक पहिले होते.

बखतगढ़ गाठले तेव्हा थकलो होतो. गायत्री मंदिरात मुक्काम, हापशावर स्नान, कपडे. समोरच्या ब्राह्मण कुटुंबाने खिचडी करून वाढली.

**दिवस ४१ वा. बखतगढ़-उमरठा १८-२०कि.मी.**

बखतगढ़ राजाचा मोठ्ठा वाडा आतून पाहता आला नाही. रात्री दरबार या त्याच्या वंशजाची भेट होऊ शकली नाही. परंतु बाहेरून मात्र त्याचा विस्तार पाहिला. अतिशय जीर्ण आणि मोडकळीला आलेला; नव्हे, प्रांगणातील अनेक खोल्यांच्या भिंती पडल्या आहेत. छताचे आधार कोसळले आहेत.

बखतगढ़ सोडले, कासरिया गाव येईपर्यंत अर्धे अंतर कापले होते. मार्गावर सुरुवातीला थोडेबहुत वृक्ष होते; नंतर शुष्क, बोडका पठारी / टेकड्यांचा प्रदेश लागला. बावनगजाची आठवण यावी असाच! भरपूर थंडी असल्याने

आम्ही लहानसहान सावलीत थांबत चालत होतो.

टेकडीवर वाटेत एक पिठाची गिरणी होती तिथे चहा मिळाला. तेथील टोमॅटो पिकाचे फोटोही घेतले.

कोसरियापर्यंत २/२११ तासांचा वैराण माळ/पठार/निर्वस्ती भाग होता. पुढील गावात भोजन मिळेल हे कळले होते, इथे येईपर्यंत भूकही लागली होती. वाटेत चणे, शेंगदाणे, बिस्किटे खाली होती; पण भूक ती भूकच.

कोसरियाच्या एकमेव किराणा दुकानातून सटर फटर खाल्ले, दुकानदार पैसे घ्यायलाच तयार नव्हते. अखेर स्नान, भोजन तिथेच झाले. अठ्ठा गावापुढे घाट सुरू झाला. टेकडीपलीकडे उमरठा गाव आहे. असे कळल्याने आम्ही उत्साहित झालो होतो. दुपारचे ३ वाजले होते. टेकडीपलीकडे पोहोचलो आणि अद्‌भुत दृश्य नजरेस आले. टेकड्याच टेकड्या लहान, मोठ्या. मध्ये घळी, त्याच्यामागे टेकड्यांच्या रांगा, त्यांच्यामागे दूरवर डोंगर, उंचच उंच. आम्ही चारही बाजूंनी डोंगरांनी वेढलो होतो.

घाटउतारावर महंत चन्द्रशेखर भारती यांची एक साधी चौकोनी मंडप कुटी आहे. त्यांनी 'नर्मदे हर' ऐकून दाराचा पडदा उघडला, बाहेर डोकावले व आम्हांला बोलावून चहा दिला.



घाट संपत आला. वस्तीच्या खुणा म्हणजे शेते, घरे, ओलाव्याची चिन्हे दिसू लागली. उमरठा गाव आले (व्होडाफोन चालत नाही). हेसुद्धा जंगलच आहे पण वस्ती आहे.

गरासिया पिता अनसिंग सचत्या गरासिया भगत यांच्याकडेच परिक्रमावासीयांना भोजन, निवास यांची व्यवस्था होते.

सरदार धरणमुळे पूर्वीचा रस्ता पाण्याखाली गेला तेव्हापासून गेली १२/१३ वर्षे भरत सेवा करीत आहेत. भगत ही सेवा करतात या गोष्टीला गावाचा विरोध होता!

**दिवस ४२ वा. उमरठा-कवाड/कवडा**



एरंडाची फुले अत्यंत सुंदर लालचुटूक दिसतात. खिरणी, ताड त्याचबरोबर सीताफळ, क्वचित पेरू, जांभूळ ही झाडे कुंपणाला दिसायला लागली आहेत. साळुंक्या खूपच आहेत. मका तुऱ्यावर येऊन कणसे धरू लागली आहेत. हरभरे, गहू शेतात आहे.

रात्री कचकून थंडी होती. डोंगरात असल्याने थंडी अधिक होती. रात्री चंद्रोदय होण्यापूर्वी आकाशात लखलख तारे दिसत होते. नकाशा होता, परंतु कंटाळा केला.

गरासिया कुटुंब स्वतःच्या तुटपुंज्या उत्पन्नातून सारा खर्च करत असते, जाहिरातीविना. पूर्वी एक गुजराती परिक्रमावासी इथ एक रात्र मुक्कामी होता, त्याने नावपत्ता देऊन तिस्तिया यास (सुरत?) बोलविले होते, पण तिस्तिया तेथे गेला नाही. तेव्हा तो गुजराती सहकुटुंब गाडी घेऊन आला व तांदूळ, डाळ, तेलाचा डबा, गहू इत्यादी सामग्री सेवाकार्यासाठी देऊन गेला. मीही  यथाशक्ति काही दिले.

सकाळी ७.१५ वा. चहा घेऊन निघालो व ५ ॥ ला कवाड येथे पोहोचलो. कालपासून सुरु झालेला डोंगराळ भाग आजही आहे तसाच!



टेमला गावात जाण्यासाठी एक नदी ओलांडावी लागते. आज या नदीला पाणी नाही. पात्र कोरडे आणि रंग चुनखडीसारखा आहे. हा पाण्याचा परिणाम की पाण्यातले दगड तसे आहेत कळत नाही, पण स्पष्ट पांढरा पट्टा दिसतो.

गावाजवळ साळुंक्या बहुसंख्य दिसतात. खकडी गावात दुकान होते तिथे काही खायचे पदार्थ मिळाले. त्याच वेळी काही तरुण मंडळी भेटली. दोघे पुण्यामुंबईस कामानिमित्त काही दिवस होते. गप्पाटप्पांनंतर घरी नेऊन एकाने चहा दिला. त्यापूर्वीही एका महिलेने हाक मारून चहा दिला. मध्यप्रदेश हा इतरांपेक्षा अधिक अगत्यशील परिक्रमावासींना मान देणारा दिसतोय. 'नर्मदे हर' चा गजर तर सर्व लहान मुलांमुलींसमवेत एका मागून एक सुरु राहतो. मधली सुट्टी झाली असावी. आम्हांला पाहून यच्चयावत मुली धावत बाहेर आल्या व हात जोडून 'नर्मदे हर' नर्मदे हर नर्मदे हर' असा गजर करू लागल्या (ही काळाची गोष्ट असावी).

टेमला येईपर्यंत भूक लागली. मोहन सोळंकी नावाच्या तरुणाकडे भाकरी, आमटी, दही भोजनासाठी होते. हातपंपावर स्नान, कपडे करून जेवणाचा तृप्त अनुभव घेतला.

ही गरीब घरेच पटकन स्वीकारतात असा अनुभव वारंवार येतो.

कवाड गावाहून डावीकडे वळून जावे लागते कारण सरळ गेल्यास हथिनी नदीमध्ये नर्मदेचे पाणी शिरल्याने ती ओलांडता येत नाही. बांधामुळे असे झाले असावे. वळसा घालून हथिनीचा छोटा प्रवाह ओलांडता येतो.

कवाडपासून पुन्हा लहानमोठ्या टेकड्याचे साम्राज्य सुरू झाले. कुकडिया गावात चहा प्यायला थांबलो. तो दारूचा अड्डा होता. ४ वाजून गेले होते. पिणाऱ्यांमध्ये तरुणांचे प्रमाण लक्षणीय होते. त्यांना पिताना पाहिले नाही, पण गुत्यातच भजी स्टॉल आहे तिथली गर्दी काही केवळ भजी खाण्यासाठी नसावी! हा विभाग आदिवासींचा आहे. तरुण टकाटक, जीन्स, पायात स्पोर्टस् शूज इत्यादी; पण पिणारेही असावेत. या समाजाला अज्ञानामुळे दारूचा शाप आहे? दारूचा अड्डा आणि भजी स्टॉल चालविणारा त्याच्या बायकोसह हा व्यवसाय करतो.

कवाड गावात सुंदर हनुमान मंदिर आहे. खिचडी करण्यासाठी सर्व वस्तू मिळाल्या. चूल पेटवून स्वयंपाक केला व जेवून तृप्त झालो.

आज समीर-वैशाली यांच्या लग्नाचा १६ वा वाढदिवस. एका ठिकाणी सिग्नल आल्यावर शुभेच्छा दिल्या.

थोड्या वेळाने समीरनेच फोन केला. त्याला सरकारी नोकरी मिळतेय. उद्या तो राजीनामा देईल व नव्या ठिकाणी रुजू होईल. पगारात फार वाढ नाही तरी वेळेवर घरी येत जाईल हीच मोठी गोष्ट. घरही मिळेल!

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

प्रत्येक यशस्वी असणाऱ्या पुरुषामागे एक स्त्री असतेच.

# व्यक्तिवेध-३ : राजा भर्तृहरी

*उज्जयिनी नगरीचा मुत्सद्दी, कुशल प्रशासक राजा भर्तृहरीचा जीवनपट या लेखात विषद केला आहे. - संपादक*

**भर्तृहरी गुहेतील राजा भर्तृहरीची प्रतिमा, उज्जयिनी**



इसवीसनपूर्व ५५४ मध्ये महाराज गंधर्वसेन (वीरसेन) उज्जयिनी नगरीत राज्य करत असत. त्यांना दोन राण्या होत्या. सुशीला नावाच्या राणीपासून त्यांना भर्तृहरी नावाचा मुलगा झाला. दुसऱ्या राणीपासून विक्रमादित्य नावाचा मुलगा झाला. हा राजा विक्रमादित्य, पराक्रमी, शककर्ता होता. आपण काल गणनेकरता जे विक्रमसंवत अनुसरत असतो त्या शकाचा कर्ता तोच आहे. राजा विक्रमादित्याचा नवरत्न दरबार होता. त्यातच कालिदास, अमरसिंह इत्यादींचाही समावेश होता. भर्तृहरीस विक्रमादित्यआणि सुभटवीर्य हे दोन धाकटे भाऊ होते. त्यांच्या बहिणीचे नाव मैनावती होते. मैनावतीचा मुलगा गोपीचंद हा पुढे जाऊन नाथपंथातील साधू झाला. उज्जयिनीमध्ये भर्तृहरीच्या गुहेनजीकच गोपीचंदाचीही गुहा आहे.

भर्तृहरी भविष्यात मोठा योगी होईल असे भविष्य वर्तवले गेले. राजपुत्र मोठा झाला. सर्व विद्यापारंगत झाला. कलानिपुण झाला. भर्तृहरी हा महाराज गंधर्वसेनांचा मोठा मुलगा असल्याने, त्यांच्या पश्चात, वयाच्या सोळाव्या वर्षी त्यास राज्याभिषेक झाला. भर्तृहरीला दोन राण्या होत्या. त्यानंतर त्याचा मगधदेशाची राजकन्या पद्माक्षी हिच्याशी विवाह झाला. तिचे नाव पिंगला ठेवले. पिंगला अतिशय सुंदर होती. तिच्या प्रेमपाशात भर्तृहरी बुडून गेला.

राजा भर्तृहरी रसिक कवी होता. थोर मुत्सद्दी होता. कुशल प्रशासक होता. मात्र राणी पिंगलेच्या प्रेमात बुडून गेल्याने तो देहभान विसरला. राज्यकारभारात त्याचे मन रमेना. त्याने राज्यकारभार विक्रमादित्यावर सोपवला आणि नवयौवनाच्या सर्व शृंगारसुखांचा मनःपूत आस्वाद घेऊ लागला. कलासक्त कवी आणि संस्कृत भाषापंडित असल्याने, त्या कालावधीत त्याने शृंगाराच्या रसास्वादावर शंभर सुरेख कवने रचली. शृंगाराचे यथातथ्यआणि सुरस वर्णन करणाऱ्या ह्या काव्याचा प्रभाव, आजही सर्व भारतभर विद्यमान आहे. अनेक लेखन विवरणांतून भर्तृहरीच्या काव्याचे संदर्भ नेहमीच दिले जात असतात. संस्कृत वाङ्मयात, छंदशास्त्रावरील कविकुलगुरू महाकवी कालिदासाचा 'श्रुतबोध' हा ग्रंथ विख्यात आहे. श्रुतबोधात वर्णिलेल्या वृत्तांत बांधलेल्या काव्याचे दाखले मात्र, भर्तृहरीच्या काव्यातूनच सहजगत्या उपलब्ध होत असतात. त्याच्या काव्याचा एक सरस दाखला खाली दिलेला आहे १.

क्वचित्सुभ्रूभङ्गैः क्वचिदपि च लज्जापरिणतैः ।
क्वचिद् भीतित्रस्तैः क्वचिदपि च लीलाविलसितैः ॥
नवोढानामेभिर्वदनकमलैर्नेत्रचलितैः ।
स्फुरन्नीलाब्जानां प्रकरपरिपूर्णा इव दिशः ॥ - शिखरिणी, शृंगारशतक-४, राजा भर्तृहरी, इ.स.पूर्व ५५४ वर्षे

म्हणजेः

कधी भ्रूभंगाने क्वचित कधि लाजून हसता ।
कधी भीतियोगे क्वचित कधि लीलेत रमता ॥
कुमारींच्या साऱ्या नयनविभ्रमी चित्त हरता ।
असे वाटे साऱ्या उमलत दिशा नीलकमला ॥ - मराठी अनुवादः नरेंद्र गोळे २०१४१०२३

राजा भर्तृहरी शूर होता. राजाला आपल्या शौर्याचा सार्थ अभिमान होता. एकदा तो उज्जयिनीच्या उत्तरेकडील तोरणमाळ पर्वतावर शिकारीला गेला होता. दिवस मावळतीला आला, तरीही शिकार गवसली नव्हती. निराश होऊन परतत असताना, त्याला हरणांचा एक प्रचंड मोठा कळपच दृष्टीस पडला. हरिणींना मारण्यात त्याला स्वारस्य नव्हते. त्याने काळविटाचा वेध घेतला. राजा त्याला घोड्यावर बांधून नेऊ पाहत होता. असंख्य हरिणींचे डोळे तडफडणाऱ्या काळवीटावर खिळून राहिले होते. काळवीट असहायतेने मरणास सामोरा जात होता. तिथेच काही अंतरावर गोरखनाथ साधना करत होते. त्यांनी ही घटना पाहिली. त्यांनी राजाला निष्कारण केलेल्या हत्येबाबत दूषण दिले. ते राजाला म्हणाले की, राजा, तुला ह्या काळविटाचे प्राण घेण्याचा मुळीच अधिकार नाही, कारण त्याला जीवदान देण्याचे सामर्थ्य तुझ्यापाशी नाही. मग गोरखनाथांनी आपल्या विद्येने त्याचे प्राण वाचविले. काळवीट उठून उभा राहिला आणि जंगलात पळून गेला. ही सर्व अद्भुत घटना पाहून राजा त्यांच्या विद्येच्या प्रभावाने स्तिमित झाला आणि त्यांचा शिष्य झाला. त्यांना आपले गुरू मानू लागला.

राजा असाच वरचेवर शिकारीला जात असे. अशा वेळी, शृंगारसुखाच्या आस्वादाला सदैव आसुसलेली राणी पिंगला, सुरक्षादलप्रमुख असलेल्या महिपाल ह्यासच जवळ करू लागली. राजाची शिकार, त्याची प्रेमासक्ती, इत्यादींमुळे राजाचे राज्यकारभाराकडे दुर्लक्ष होऊ लागले. त्या काळात उज्जयिनीस परकीयआक्रमणांचा धोका संभवत होता. विक्रमादित्याने भर्तृहरीला त्याची कल्पनाही दिली. मात्र शृंगाररसात आकंठ बुडालेल्या भर्तृहरीस ते रुचले नाही. त्याने विक्रमादित्यासच राज्याबाहेर घालवून दिले.

त्या दरम्यान, उज्जयिनीत एक जयंत नावाचा ब्राम्हण राहत असे. त्याने केलेल्या तपःसाधनेमध्ये, त्याला एक दिव्य फळ प्राप्त झाले होते. त्या फळाचे सेवन केले असता, सेवन करणारा मनुष्य अमर होणार होता. ब्राम्हणाने विचार केला की, मी अमर झाल्याने कुणाचे भले होणार? त्यापेक्षा राजा अमर प्रजेचे भले होईल. म्हणून राजदरबारात जाऊन त्याने ते फळ राजास अर्पण केले. राजाचे राणी पिंगलेवर अपार प्रेम होते. त्याला असे वाटे की, राणी पिंगला जर अशीच चिरतरूण राहिली, तरच आपल्याला खरा सुखोपभोग मिळण्याचा संभव आहे. म्हणून त्याने ते फळ राणी पिंगलेला दिले. राजाच्या अनुपस्थितीत राणीने असा विचार केला की, आपल्याला खरे सुख महिपालाकडूनच मिळत असते. तेव्हा तोच जर चिरतरूण राहिला तर आपल्याला खरे सुख दीर्घकाळ लाभू शकेल. म्हणून तिने ते फळ महिपालाला दिले. महिपालाचे लाखा नावाच्या एका राजनर्तिकेवर मन जडले होते. त्याने असा विचार केला की आपल्याला जर चिरसौख्य हवे असेल तर, राजनर्तिका चिरतरुण राहायला हवी. म्हणून त्याने ते फळ तिला दिले. राजनर्तिकेला असे वाटत होते की, आपण चिरतरुण होऊन काय साधणार, त्यापेक्षा राजा चिरतरुण झाल्यास साऱ्याच प्रजेला दीर्घकाळ सुखात ठेवेल. म्हणून एक दिवस राजदरबारात येऊन तिने ते दिव्य फळ राजास अर्पण केले. राजाने ते दिव्य फळ ओळखले. फळाच्या प्रवासाची हकिकत त्याने शोधून काढली आणि तो सुन्न झाला. त्याला वाटत होते की राणी पिंगलेचे त्याच्यावर अपार प्रेम आहे. प्रत्यक्ष राजाची राणी असलेल्या पिंगलेने, महिपालावर प्रेम करावे ह्या वास्तवाने त्याला वैराग्य प्राप्त झाले. ताबडतोब, म्हणजे वयाच्या सतराव्या वर्षी, त्याने विक्रमादित्यास पाचारण करून, राज्य त्याच्या हवाली केले आणि संसारत्याग करून तो चालता झाला.

राजाचे वैराग्य पराकोटीचे होते. गुरू गोरखनाथांपाशी त्याने संन्यास घेण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी त्याकरता आसक्तीचा संपूर्ण त्याग करणे आवश्यक असल्याचे सांगितले आणि त्याच्या वैराग्याची परीक्षा घेण्याकरता, त्याला राणी पिंगलेकडून भिक्षा मागून आणण्यास सांगितले. राजाने तेही केले. ''भिक्षा दे, माते पिंगले!'' अशी त्याने भिक्षा मागितली. राणीच्या अविरत विलापानेही तो मुळीच द्रवला नाही. योगचर्या पत्करण्याच्या त्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची राणी पिंगलेची विनंती त्याने फेटाळून लावली. नंतर त्याने उज्जयिनी नगरीबाहेरील क्षिप्रा

नदीच्या किनाऱ्यावरील गुहेत बारा वर्षे तपश्चर्या केली. नाथपंथाच्या वैराग्य उर्फ बैरागी उपपंथाची त्याने स्थापना केली. पराकोटीच्या वैराग्याचे स्वतःचे अनुभवही, त्याने शृंगाराच्या अनुभवांप्रमाणेच काव्यात रचून ठेवले. ते काव्यही जनमानसात अजरामर झाले. त्या शंभर कवनांना वैराग्यशतक म्हणून ओळखले जाते. त्या सुरस काव्याची मोहिनी, त्यानंतरच्या भारतीय तत्त्वज्ञानावरील सर्वच रचनांवर पडलेली आहे. उदाहरणार्थ पुढील वर्णन पाहा. त्यातील ''कालाय तस्मै नमः'' हा शब्दसमूह तर मराठी, हिंदी आणि संस्कृत साहित्यातील वाक्प्रचारच बनून राहिला आहे.

सा रम्या नगरी महान्स नृपतिः सामन्तचक्रं च तत् ।
पार्श्वे तस्यच सा विदग्धपरिषत्ताश्चन्द्रबिम्बाननाः ॥
उद्वृत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बन्दिनस्ताः कथाः ।
सर्वं यस्यवशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥
शार्दूलविक्रीडित, वैराग्यशतक-३९

म्हणजेः

ती माया नगरी, महान नृपती, मंत्रीहि सारे तसे ।
ती विद्वानसभा, तशाच ललना तेथील चंद्रानना ॥
तो गर्वोन्नत राजपुत्र, सगळे ते भाट, त्यांच्या कथा ।
हे ज्याने स्मरणार्थ नीट रचिले, काळा नमस्कार त्या ॥
- मराठी अनुवादः नरेंद्र गोळे २०१४१०२३



**भर्तृहरी मंदिर, अलवार**

उत्तर आयुष्यात राजा, राजस्थानातील अलवार गावानजीक राहत असे. आजही तिथे राजा भर्तृहरीची समाधी आणि मंदिर आहे. तिथे पाण्याचे कायमच दुर्भिक्ष असे. आसपासच्या लोकांना राजास प्राप्त असलेल्या अद्भुत सिद्धी माहीत होत्या. त्यांनी त्यास पाणी मिळवून देण्याची विनंती केली. आपल्या अलौकिक सिद्धीचा वापर करून राजाने खडकातून निर्झर उत्पन्न केले. राजस्थानातील लोककथांतून भर्तृहरीच्या असंख्य कहाण्या शतकानुशतके गायिल्या जात आहेत. उत्तर आयुष्यातील समृद्ध अनुभवांच्या आधारे, राजाने जगात कसे वागावे ह्याचे सुरेख उद्बोधन शंभर कवितांत करून ठेवले आहे. ह्या शंभर कवनांना नीतिशतक म्हटले जाते. नीतिशतकातील काव्य, भारतीय संस्कृतीत एखाद्या चमचमत्या तेजस्वी ताऱ्याप्रमाणे कायमच तळपत आलेले आहे. उदाहरणार्थ पुढील कवनात तर स्वतःच्या जीविताचे सारच जणू भर्तृहरीने काव्यात गुंफून ठेवले आहे. एवढेच नव्हे तर सामाजिकदृष्ट्या ते निंदनीय आहे असे सांगून, अशा वर्तनांचा धिक्कारही केला आहे.

यां चिन्तयामि सततं मयि सा विरक्ता ।
साप्यन्यमिच्छति जनं स जनोऽन्यसक्तः ॥
अस्मत्कृते च परिशुष्यति काचिदन्या ।
धिक् तां च तं च मदनं च इमां च मां च ॥ वसंततिलका
नीतिशतक-२, राजा भर्तृहरी, इसवीसनपूर्व ५५४ वर्षे

म्हणजे:

मी जीस चिंतीत असे, न रुचे तिला मी ।
जो आवडे तीस, तयास रुचे परस्त्री ॥
तो आवडे ना परस्त्रीस, मला वरे ती ।
धिक् तीस, त्यास, मदनास, हिला, मलाही ॥
मराठी अनुवादः नरेंद्र गोळे २०१४१०२३

राजाचे अनुभव अत्यंत समृद्ध होते. त्याची भाषा अतिशय श्रीमंत होती. अनुभवांचे सार काव्यबद्ध करून ठेवत असताना त्याला भाषेची रंगत उमगली. त्याने संस्कृत भाषेच्या व्याकरणावर 'वाक्यपदीय' ह्या नावाचा अलौकिक ग्रंथ रचला. त्यातील 'स्फोट' सिद्धांताने, त्यानंतरच्या संस्कृत भाषारचनांवरील सर्व ग्रंथांत मानाचे स्थान मिळवले आहे. तोंडातून फुटणाऱ्या अविभाज्य उच्चारांचे 'वर्ण' असे वर्णन करण्याची संकल्पना ह्याच सिद्धान्ताचा भाग आहे.

भर्तृहरी उज्जयिनीचा राजा असला तरीही, सर्व भारतभर तो लोककथांतून अजरामर झालेला आहे. दक्षिण भारतात भर्तृहरीकथांचे निरूपण केले जाते. उत्तर भारतात त्याच्या विचारांचा सन्मान केला जातो. त्याच्या उज्जयिनीत, लोकांच्या व्यवहारात त्याच्या शतककाव्यांची अमिट छाप पडलेली दिसून येते. तर त्याचे कर्तृत्वक्षेत्र असलेल्या राजस्थानात आजही त्याच्या नावे यात्रा भरतात, मंदिरे घडविली जातात आणि लोकगीतांच्या माध्यमातून त्याची शिकवण लोकमानसावर संस्कार करत असते. राजा भर्तृहरीच्या शतकत्रयीने, इतर संस्कृत साहित्यावर सखोल ठसा उमटवला आहे. शतकानुशतके जनमानसावर राज्य केले आहे. अनेक भारतीय भाषांतील वाक्प्रचार आणि म्हणी ह्यांत शतक-त्रयींतील श्लोक अभिव्यक्त झालेले दिसून येतात. उदाहरणार्थ 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' हे वाक्यही, वामन पंडितांनी मराठीत अनुवाद केलेल्या भर्तृहरीच्याच एका कवितेचा एक चरण आहे.

लभेत सिकतासु तैलमपि यत्नतः पीड्यन्पिबेच्च ।
मृगतृष्णिकासु सलिलं पिपासार्दितः॥
कदाचिदपि पर्यटन्शशविषाणमासादयेन्नतु ।
प्रतिनिविष्टमूर्खजनचित्तमाराधयेत्॥- नीतिशतक-५, राजा भर्तृहरी, इसवीसनपूर्व ५५४ वर्षे

प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलहि गळे ।
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिउनीही वितळे ॥
सशाचेही लाधे विपिनी फिरता शृंगही जरी ।
परंतु मूर्खाचे हृदय धरवेना पळभरी ॥
- मराठी अनुवादः वामन पंडित, इ.स.१६०८ ते १६९५

स्वतः राजा भर्तृहरी मात्र पूर्वसुरींच्या पुण्यप्रभावाने अतिशय प्रभावित झालेला होता. पतंजलि मुनींबाबत तर त्याला विशेष आदर वाटत असे. पुढील कवनातून तो यथार्थपणे अभिव्यक्त होतांना दिसतो.

योगेन चित्तस्य पदेन वाचा मलं शरीरस्यच वैद्यकेन ।
योऽपाकरोत्तं प्रवरं मुनीनां पतंजलिं प्रांजलिरानितोऽस्मि ॥
- राजा भर्तृहरी २

म्हणजे, योगाच्या साहाय्याने चित्तशुद्धी, पाणिनीच्या सूत्रांवर 'महाभाष्य' लिहून वाचाशुद्धी आणि चरकसंहितेच्या पुनर्संस्करणाद्वारे वैद्यकाच्या आधारे शरीरशुद्धी, ह्यांची साधने उपलब्ध करून देणाऱ्या पतंजलि मुनींना, मी अंजलीबद्ध करतो. अशा प्रकारे आपल्या 'वाक्यपदीय' ह्या ग्रंथात पतंजलि मुनींबाबत गौरवपर उद्गार काढणाऱ्या राजा भर्तृहरीने, पुढे त्यांचाच वारसा चालवला. नाथसंप्रदायात योगसाधना करत असता, 'वैराग्य उर्फ बैरागी पंथ' स्थापन केला ३. 'वाक्यपदीय' ग्रंथाची रचना करून वाचाशुद्धीचा वसा चालवला. तसेच खडकांतून निर्झर निर्माण करून शरीरशुद्धीची साधने सामान्यांना उपलब्ध करून दिली.

एवंगुणविशिष्ट राजा भर्तृहरीस सादर प्रणाम!

**संदर्भः**


१. भर्तृहरीकृत सार्थ शृंगारशतक, वैराग्यशतक आणि नीतिशतक, वामन पंडितांनी केलेल्या मराठी पद्य अनुवादासहित; वरदा प्रकाशन, सप्टेंबर २००५, किंमत प्रत्येकी रु. २५/- फक्त.

२. भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पातंजल योगदर्शन, योगाचार्य कृष्णाजी केशव कोल्हटकर, आदित्य प्रतिष्ठान प्रकाशन, विरोप पत्ता (विद्युत् निरोप = विरोप, इ-मेल ॲड्रेस) aparna.shankargmail.com, संकेतस्थळः http://www.adityapratishthan.org/, प्रथम आवृत्तीः १८-०२-२००४, प्रस्तुत तृतीय आवृत्ती: १४-०१-२००७, देणगीमूल्य केवळ रु.५००/-.

३. राजा भर्तृहरी http://iyadav.com/saint-king-bharthari



**नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) -४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com


●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

## प्रास्ताविक

ब्रह्मकुमारी संप्रदयानुसार पृथ्वीवरचे सध्याचे जीवन 'संगमयुगातले' आहे. कलियुग व त्यानंतर विश्वचक्राच्या कार्यक्रमानुसार 'सत्ययुग' येणार आहे!!




ह्या संकल्पना भारतीय ज्ञानातील पुराणे व श्रुती, स्मृती या संहितांच्या आधारावर आपला वर्तमान काळापर्यंत भारतीय समाजमनात थोड्याशा पुसट व ''अश्रद्ध'' स्थितीत दृढ आहेत. भारतीय संस्कृतीचा हा एक फार महत्त्वाचा भागच नव्हे, तर मूलाधार आहे.

काय आहे या संकल्पनांचे महत्त्व?

## शरीरबद्ध आत्मा

कारण भगवद्गीतेनुसार ह्या युगात जीवात्म्याला 'पुरुषार्थ' करणे हे हितकर सत्य (Truth) जीवन उद्दिष्ट आहे!!

कारण 'मानवदेह' हा मर्त्य जीवनाचा भाग आहे. त्याचे 'खरे स्वरूप' हे 'शरीरबद्ध आत्मा' हे आहे आणि आपले खरे अस्तित्व हे 'आत्मा' किंवा 'जीवात्मा' असे आहे. ह्या भौतिक जीवनात हा जीवात्मा देहधारी आहे व त्याला सध्याच्या संदर्भाने जवळ जवळ १०० वर्षे सरासरीने एवढेच वास्तव्य प्रदान केले आहे.

## कुणी 'प्रदान' केले?
## कोण विश्वनिर्माता?

ह्या प्रश्नावर सध्याच्या मानवी जीवनात, समाजात, जगातही सततचे वाद आहेत. पण हे वाद साध्या चिंतनाने सुटणारे नाही आहेत. मानवी बुद्धी व मानवी तर्कशास्त्राच्या क्षमतेबाहेरचे आहेत. त्यामुळे जवळ जवळ दुर्लक्षित जिज्ञासेचे बनले आहेत.

## दोन बाजू

दोन पक्ष आहेत. 'भौतिकवाद' व 'अध्यात्मवाद' अशी ही नावे आहेत. Materialist व Spiritualist ह्या इंग्रजी भाषेतील शब्दांनी त्यांना आज जाणले जाते. मानवी समाजमनात त्यामुळे 'एक ज्ञानफाळणी' झाली आहे!!


## True Reality

मग अर्थातच मानवी अस्तित्वाचा खरा अर्थ कसा लावायचा? 'ऋत व सत्य' ह्या अध्यात्मिक वादातील संकल्पना की भौतिकवादी वैज्ञानिक Objective Reality ह्या संकल्पनेचा आधार मानायचा?

भौतिकवादामध्ये ह्याचा विचार बाजूला ठेवून हे भौतिकवादी सूर्य, पृथ्वी, तारा, धुमकेतू व आकाश ह्या दृश्य जगालाच व दृश्य प्राणी, वनस्पती, मानव जीवनालाच फक्त वास्तवता आहे असे मानतात (म्हणजे Reality.)

त्यामुळे आपण जी 'पुराणे' ह्या वर्णनाने काही विधाने केली, ती खोट्या भ्रामक संकल्पना, ह्यांची नव्हेच, 'भ्रमचित्रे' किंवा Ideal Dreams असत्य पोकळ स्वप्ने आहेत, असे मानतात.

### Matter Shall see spiriti's face



उलट भारतीय सांस्कृतिक जीवनात ह्या आधारावर ग्रह, तारे ह्यांना देवतांचे स्थान आहे. ज्योतिषशास्त्र, आयुर्वेद शास्त्रात ह्यांना ज्ञानाच्या धारणा प्राप्त आहेत.

अध्यात्मशास्त्रातही ह्या ज्ञानाला वास्तव सत्याचा मान आहे!! पण मग खरी वस्तुस्थिती काय आहे? भौतिकवाद्यांच्या बाजूने ह्या आदि अंत वादाचा शोध चालू आहे आणि 'मानवी जीवनाचा' अर्थ लावण्याच्या प्रयत्नापेक्षा, प्राणिजीवनाला जसा हा प्रश्न न सोडवता जीवन जगावे लागते, तसाच काहीसा प्रकार, मानवी जीवनात करत राहावा व मुकाट्याने 'मृत्यू' ह्या घटनेला बळी पडावे असा समज लोकमान्य आहे!!

### Search in Spiritualism for Cosmic absolute Truth

याउलट 'अध्यात्मवादाला' ह्या मानवी जीवनाचे सत्य शोधण्याचा एक सत्य आराखडा व मार्ग आहे असा विश्वास आहे.

ह्याचा मानवी जीवनाने सतत विचार व चिंतन चालू ठेवले आहे!

### एकांगी भौतिकवादी

भौतिकवादी हे त्यांच्या विश्वासाच्या व बुद्धीच्या मार्गाने व मानवी तर्कबुद्धी व भौतिक इतिहास व साधने, ह्यांच्या मदतीने जरुर तपास घेत आहेत. पण अजून 'सत्य' सापडावयाचे आहे.

### भौतिकवादी सत्यशोध आदि अंत न समजणारा

मग ते सत्य कशाला म्हणतात? हे जाणावयाला म्हणजे भौतिकवादी यांच्या 'ज्ञानाच्या' अवाढव्य शास्त्राने, त्याकरिता धडपड करावी लागेल ना?

### Integral Search of Truth

उलट 'अध्यात्मवादी' वा Spiritualist हे ह्या प्रश्नाचा विचार Religion ह्या संकल्पनेवर गृहीत धरतात व जीवन जगतात. इथे मी जो Religion हा शब्द वापरला त्यांची नावे ज्यू, ख्रिश्चन, इस्लाम व काही इतर बारीक धर्मांची नावे घेता येतील. पण ज्याला 'हिंदुधर्म' म्हणून म्हटले जाते, त्या धर्माचा विश्वास 'सनातन धर्म' 'Cosmic Truth Law' यावर विश्वास आहे. ह्याचा सांस्कृतिक इतिहास 'आर्यांच्या वेद ज्ञानात' आहे. त्यावर आत्म्याच्या स्तरावर पूर्ण 'श्रद्धा' आहे.

ह्या वैदिक ज्ञानाला 'श्रुती ज्ञान' म्हणजे प्रत्यक्ष विश्वनिर्मात्यांनी उच्चारलेले 'शब्द (तत्त्व)' हा आधार आहे. हे ज्ञान (श्रुती) ह्या काही प्रगल्भ ऋषी, मुनींनी व निर्मात्या परमपुरुषाच्या कथन, गीताच्या आधाराने 'साक्षात्कारी ज्ञान' ह्या पद्धतीने जाणले आहे, असा 'इतिहास' आहे. हा 'इतिहास' प्रधानतः 'भारत' ह्या देशात घडला आहे व तो इ.स. पूर्व ५००० ते १०,००० ह्या पुरातन काळातला आहे.

### बीजात्मक संकल्पनांचा अभ्यास

ह्या वैचारिक ओघात आपल्याला काही महत्त्वाच्या संकल्पनांचा मूलभूत विचार करावयाचा आहे.

१) प्राण २) आत्मा ३) भौतिक, आध्यात्मिक वाद-मानवी अस्तित्वाचा बीज अर्थ, सत्य अर्थ

''ॐ प्राणाय नमो यस्य सर्वमिदं पशे,
यो भूतः सर्वस्येश्वरो
यस्मिनत्सर्वं प्रतिष्ठितम्।'' (अथर्ववेद प्राणसूक्त, मंत्र)

प्राण हा वैदिक कोषातील शब्द आहे. प्राण म्हणजे श्वास नव्हे. इंग्रजीत Breath हा शब्द प्राण ह्या शब्दाला

मानतात ते बरोबर नव्हे. Breath ह्याचा अर्थ श्वास असा म्हणता येईल.

स्वामी विवेकानंद यांनी प्राणचा अनुवाद Psychic Force असा केला आहे. तोसुद्धा बरोबर नाही. जरी प्रत्यक्ष संकल्पनेच्या पुष्कळ जवळपासचा आहे. कारण Psychic ह्या इंग्रजी शब्दात मानसिक असा संदर्भ लागतो पण प्राण व मन ह्या पूर्णपणे स्वतंत्र संकल्पना आहेत.

थोडक्यात प्राणतत्त्वाचा किंवा संकल्पनेचा अर्थ समजून घ्यावयाचा असल्यास, प्राण एक सूक्ष्म अतिसूक्ष्म चेतनतत्त्व आहे.

विश्वाचे आदिकारण आहे
ब्रह्मापासून उत्पन्न झाला आहे.
''यथाग्नेः क्षुद्रा विस्फुलिङ्ग।
व्युच्चरन्ये व मेवास्य दात्मनः सर्वे प्राणः।

''जैसे अग्नि से छोटी चिनगारियाँ निकलती हैं, वैसे ही इस आत्मा से सब प्राण (निकलते) हैं''- बृ.२,१,२०

''आत्मन एवः प्राणो जायते।''
आत्मासे वह प्राण उत्पन्न होता है। प्र.३,३

शिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व सृष्टीचे बीज प्राणच आहे.

''यदिदं'' किंच जगत्सर्व प्राण एतति निःसुतम!।
- कठ.६,३

यह जो कुछ जगत है, सब प्राण के
स्पंद से निःसृत होता है।
(अर्थात प्राण सारे जगत्‌का 'कारण' है।)

ह्या लेखाच्या शीर्षकामध्ये ''भारतीय संस्कृतीचे बीज'' असा संदर्भ दिला आहे.

तेव्हा हीसुद्धा गोष्ट सांगितली पाहिजे की प्राण हाच सर्व सृष्टी व जीवनाचे 'बीज' आहे. बीजापासून जशी वृक्ष, वनस्पती ह्यांची वृद्धी होते तशीच 'प्राण' ह्या बीजतत्त्वापासून आधिदैविक (Cosmic) आणि आध्यात्मिक (Microcosmic) दोन रूपांत निर्मिती होते.

**'प्राण' संकल्पनेचा नवीन शोध**


प्राण एक स्वतंत्र सत्य आहे. ते ब्रह्मापासून उत्पन्न होते. एक गोष्ट खरी आहे की 'प्राण' ह्या बीजतत्त्वाबद्दल अनेक अर्थ काढले जातात व त्यामुळे थोडी गोंधळाची परिस्थिती प्राप्त होते. ह्या परिस्थितीचा पूर्ण विचार या लेखात मांडण्याचा प्रयत्न मी इथे करणार नाही आहे.

**प्राणायाम की श्वासायाम?**

पण मला एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे लक्ष वेधावयाचे आहे ते म्हणजे 'प्राणायाम' ह्या योगशास्त्रातल्या क्रियेच्या ज्ञानाबद्दल!

प्राणाला वायुक्रिया असे समजून हठयोग वगैरे शास्त्रात त्याला सामान्य क्रिया संबोधून एक तऱ्हेचे सामान्यीकरण झालेले दिसते.

**''प्राणेन धर्यते लोकः। सर्व प्राणमयं जगत''**




प्राणानेच सर्वांना धारण केलेले आहे. तसेच सर्व प्राणमय आहे. म्हणूनच 'प्राण' हाच धर्म आहे. प्राणाच्या अस्तित्वामुळेच इंद्रिये, अंगप्रत्यंग, मन, बुद्धी, अहंकार आदी सर्वांचे अस्तित्व टिकून आहे. हा प्राणच ईश्वर आहे, तोच भगवान आहे.

**हा प्राणच उत्सस्थल आहे!!**

म्हणूनच प्राणच आदिशक्ती किंवा आद्यशक्ती आहे.



वाचस्पती अशोककुमार चट्टोपाध्याय यांनी 'प्राणमयं जगत' ह्या लहानशा पुस्तकात ही वेगळी, पण 'संशोधन' करण्यायोग्य व सत्य भूमिका मांडली आहे.

**साधनाविचार**

यापुढचा विचार करण्याआधी स्वतःला मन व हृदय यांच्यामध्ये असलेली गूढ क्रिया, संवेदना, भाव ह्यांना सूक्ष्म अंतर्दृष्टीने बघण्याची सिद्धी जागृत करावयाला हवी. 'मन, प्राण, अंतःकरण, दृश्यांतील निरनिराळे मनोभाव, हृदयभाव ह्या गोष्टी साध्या दृष्टीने दिसणाऱ्या वा जाणवणाऱ्या नव्हेत. जेव्हा शरीरामध्ये चैतन्य असेल तेव्हांच त्या गोष्टींचा शोध व मनाच्या चक्षूंनी 'अनुभूती' होणाऱ्या क्रियेने त्या जाणल्या जातील व त्यापासून काही विशेष ज्ञान प्राप्त होऊ शकेल. याकरिता अर्थातच ह्या युगात याच क्षणी शरीरांत प्राणशक्ती व चैतन्य असताना हे ज्ञान व ह्या क्रिया करण्याचा 'पुरुषार्थ' करावा लागेल. तो मानवी जीवनाचा एक भाग आहे. व त्याचे पुण्य (Credit) जीवात्म्याला होते. या ज्ञानाला वाचस्पती अशोककुमार चट्टोपाध्याय **कुठला आधार 'प्रमाणक्षमतेचा' देतात?**

**उद्धरेत् आत्मनात्मानम् नात्मानमवसादयेत्।**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः॥६॥५॥**

भ.गीता अ.६, श्लो.५

ह्या प्रसिद्ध श्रुती (गीता) ज्ञानावर आपण पूर्वीच विचार केला आहे.


पण अशोककुमार आणखी एक महत्त्वाचा संदर्भ देत आहेत. तोच त्यांच्या शब्दांतच थोडक्यात बघू या.

**प्राणकर्म गर्भाशयात व मृत्यूनंतर आत्म्यात**

परंतु प्राणकर्म किंवा आत्मकर्माची सार्थकता, प्रयोजनीयता इत्यादी संबंधातील ज्ञान प्राप्त करण्याआधी जिवाला स्वतःच्या 'निजस्वरूपाच्या' संबंधीचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

''मातृगर्भातील गर्भ, बाहेरचा श्वास प्रश्वास न घेता जिवंत असतो, त्या वेळी त्याची जिव्हा ऊर्ध्वमुखी असते व तो कूटस्थामध्य आत्मरुपी ध्रुवताऱ्यावर दृष्टी स्थिर करून ध्यानावस्थेत सतो. त्या वेळी तो गर्भ शरीरात असलेल्या जलात अवस्थित असतो. 'जलास' 'नारो' असे म्हणतात, म्हणूनच तो गर्भ तेव्हा 'नारायण' असतो. गर्भ भूमिष्ट झाल्यावर रडू लागलो. त्या वेळी त्याची जीभ आपल्या स्थानापासन विच्युत होते आणि श्वास प्रश्वास जो यापूर्वीपर्यंत सुषुम मार्गात चाललेला होता, तो आता त्याला बहिर्गती (प्राप्त) झाल्यामुळे इडा, पिंगलेस चालू होतो.

जन्माला आलेले मूल जेव्हा रडू लागते, त्याला 'लोक मायेचे रडणे' असे म्हणतात. सत्य हेच आहे की, मायेमुळेच रडणे होऊ लागले आहे. कारण बाळ त्या वेळी मायेला 'वशीभूत' झाले आहे. महामायेने त्यास ग्रासले आहे. अर्थात श्वास प्रश्वास गती उत्तरोत्तर वाढू लागली आहे. गर्भावस्थेमध्ये ज्या सुंदर आत्मज्योतिरुपी बिंदूमध्ये ध्यानमग्न होते, त्या अवस्थेपासून विच्युत होऊन त्या ध्यानअवस्थेचा अभाव बोध होऊ लागल्यामुळे रडू लागले आहे. त्या ध्यानावस्थेत परत जाऊ शकत नसल्याने त्याला दुःख होते.




Effect of chanting of the subtle body in the foetus on the mother

''दुः=दूर, ख=ब्रह्म - अर्थात खं रूपी'' ब्रह्मापासून दूर झाल्यामुळे, तसेच त्या सुंदर मनमोहिनी आत्मज्योतीचा अभावबोध झाल्यामुळे ज्याला दुःख होत आहे. मनुष्य सुखात हसतो व दुःखात रडतो. बाळ जन्म ग्रहण केल्यावर आनंदित तर होत नाहीच. उलट त्याला दुःख होऊन ते रडू लागते. तो तेवढाच ब्रह्मापासून दूर, आणखी दूर जात राहतो... ''...काही भाग्यवान साधक सद्‌गुरुंबरोबर संधान साधू शकतात. तेव्हा त्याना सद्‌गुरू आपल्या पूर्वावस्थेत जाण्याचा मार्ग दाखवतात अर्थात त्या श्वास प्रश्वासांना अंतर्मुखी गती करून कशा प्रकारे आपल्या मूळावस्थेत जायचे, याचा मार्ग दाखवतात.''

अर्थात चंचलता प्राप्त करून ज्या मार्गाने ते मस्तकातून खाली उतरले होते, त्याच मार्गातून परत वर जाऊन कशा प्रकारे ती स्थिती कशी करून घ्यावयास हवी त्याचा मार्ग प्रशस्त करतात.

यालाच 'उल्टा जपती राम' असे म्हणतात. रामाच्या ऐवजी उलटा मरा जप करणे नव्हे. जो मरा उच्चार करू शकतो, तो राम असा उच्चार नक्कीच करू शकतो. ह्या उलट भावाकडे लक्ष वेधण्यासाठी महात्मा कबीर म्हणतात -

''उल्टा नाम जपण जग जाना, वाल्मिकी भये ब्रह्म समाना॥''

**या अर्थबदलामुळे साधनाबदल, कर्मबदल**

या विवेचनाचे काही नवीन अर्थ निघतात व त्याला नवीन ज्ञान समजून आपल्या कर्म व पुरुषार्थ कल्पनेत बदल घडवावे लागतील. त्यातील योग क्रियांमध्येसुद्धा योग्य समज व बदल करावे लागतील. ते कां? ''बहिर्मुखी प्राणायाम'' सतत चाललेला आहेच. श्वास प्रश्वासाच्या या 'बहिर्मुखी गतीमुळे', जिवाचे मन बाहेरच्या विषयांकडेच आकर्षित होत असते.

सद्‌गुरुप्रदर्शित मार्गावर, सहजकर्मरूपी प्राणायामद्वारा! श्वास प्रश्वासाची गती अंतर्मुख होते. आणि अशा प्रकारे इडा, पिंगलेचा अतिक्रम करून ती सुषुम्नामार्गी होते. प्राणाची गती सुषुम्नामार्गी झाल्यावरच प्राणाची चंचलता नाहीशी होते आणि त्यामुळे प्राण 'स्थिर' होतो तेव्हा आत्मज्योतिदर्शनामुळे योगी निश्चल होऊन जातो आणि शेवटी त्याला वरती (ऊर्ध्वामध्ये) स्थायी स्थिती प्राप्त होते.

साधक तेव्हा इच्छारहित होऊन तीन गुणांच्याही (सत्व, रज, तम अर्थात इडा, पिंगला व सुषुम्ना) पलीकडे जातो.

- हेच ब्रह्मदर्शन किंवा ब्रह्मभाव आहे.
- प्राणकर्म केल्यावरच प्राण स्थिर होतो.
- प्राण स्थिर झाल्यावरच मन व बुद्धी स्थिर होऊन त्रिगुणातीत अवस्थेचा लाभ होतो.
- गुरू, भगवान व शिष्य एक होऊन जातात त्यालाच किंवा तेच 'उत्सस्थल' होय.

भगवद्‌गीतेतल्या ६ व्या अध्यायातील ५ व्या श्लोकाचा साधनेतील अर्थ हा जाणणे आवश्यक आहे.

''आत्म्याद्वारा आत्म्याला नेहमी वरती अर्थात आज्ञाचक्रात ठेवा. आत्म्याला कधीही अधोगतीत अर्थात कूटस्थाच्या खाली जाऊ देऊ नका.''

''आत्म्याला वरती म्हणजे कूटस्थात स्थापित केल्यावर आत्माच आत्म्याचा बंधू किंवा मित्र आहे. तसेच कूटस्थाच्या खाली स्थापित केल्यावर आत्माच आत्म्याचा शत्रू होतो.''

कारण, प्राणप्रवाह निम्नगामी (कूटस्थाच्या खाली) झाल्यावरच देहभाव जागृत होतो, तसेच इंद्रिये आणि 'रिपुगण' कार्यक्षम होऊन बहिर्मुखी गतीस प्राप्त होतात आणि विरुद्ध आचरण करतात.

रजोगुणप्रधान त्यागी 'क्षत्रिय' आहे. अर्जुन क्षत्रिय आहे. क्षत्रियाचे काम आहे शत्रूशी अर्थात इंद्रियांशी 'युद्ध' करुन सत्त्वगुण विशिष्ट होण्याचा प्रयत्न करणे.

इंद्रियेच साधनमार्गातील प्रमुख शत्रू आहेत. इंद्रियेच

जे घाईघाईने वर चढू पाहतात ते कोसळतात.

जिवाला विषयाकडे आकृष्ट करतात आणि जीव त्या इंद्रियभोगालाच आपला भोग समजतो.

**सत्य अर्थ साधनेचा फारक**

अर्थात आपण कुठल्या 'मोड' (Mode) मध्ये आहोत, कुठल्या युगात (संगम युग) आहोत, कुठल्या स्थानी आहोत, कुठल्या समय वेळी (Time Mode) आहोत असे ध्यानात आणून त्या त्या प्रकारच्या योजिलेल्या (Customised Mode) उपदेशाचे स्मरण करुन मग त्या त्या योग्य Mode ची धारणा करून साधना करावयाला हवी किंवा कर्म करावयाला हवे. नाहीतर मनाची व त्यामुळे प्राणाची चंचलता व गोंधळ वाढेल (Confusion) हे पक्के ध्यानात धरावे.

**गीतेतील बुद्धियोग आवश्यकता**

कारण आता आपण 'बुद्धियोग' म्हणजे भगवद्गीतेत सांगितलेल्या 'पवित्र बुद्धी'च्या मदतीने विचार करणार आहोत. ह्या विचारांच्या योग्य मदतीशिवाय कृती, कर्म करावयास लागलो तर विपरीत परिणाम व ज्ञान वा यज्ञक्रिया या **'शरीरबद्ध आत्म्याच्या'** व्हाव्या लागतील हे पक्के ध्यानात व धारणेत ठेवावे लागेल!!

'कर्मक्रिया' ह्या सुधारित विचार व ज्ञान धारणेत 'परिवर्तित' करून आपल्या इच्छित उद्दिष्टापर्यंत पोहचणार आहोत!!

ह्या प्राणसंकल्पनेला श्वास क्रिया संकल्पनेच्या मानून वेगळे बघण्याने आपल्या वैचारिक क्रियात्मक आणि ज्ञानांतर यज्ञामध्ये फरक पडतो, तो असा की, ह्या अवस्थांमध्ये श्वासाच्या ऐवजी प्राण (जागृत) ह्याचा उपयोग नवीन 'प्राणकर्मासाठी' होतो व त्याची क्रिया (Operations) ही आपल्या दृष्टीच्या एकाग्रतेला आपला आत्मा व आपला परमात्मा ह्या दोन केंद्रांमधील संबंधांवर (Relations) आधारित असणार आहे!! हे (Communication Contacts) नातेसंबंध व्यवहार गीतेच्या 'वासुदेव' कॉन्शसनेसच्या पुढील 'पुरुषोत्तम योग' किंवा 'Integral Yaga' च्या System म्हणजे यंत्रणेवर आधारित असतील. 'Ascension', Descension ह्या क्रिया ह्या ध्यानबिंदूच्या मदतीने व संकलनगतीनुसार **आपल्या कॉन्शसनेसची पातळी 'परिवर्तन'** ह्या प्रकारे आत्मयज्ञ करू लागेल!!

तुमच्या कल्पनेतले 'परिवर्तन' हे भौतिक स्तरावर Munden भूमिस्थ Easthly स्तरावर, 'माये'मधील संकल्पनांवर यंत्रणेवर आधारलेले असल्याने, खरे व सत्य परिवर्तनापासून कमी दर्जाचे (कनिष्ठ) व भ्रममूलक असणार आहे, हे पक्के जाणून घ्या. अशा तऱ्हेच्या 'परिवर्तनाची संकल्पना' तुमचे भौतिकवादी, अश्रद्ध व अज्ञानी सामाजिक, राजकीय व (So Called) समाजशास्त्रज्ञ, आतापर्यंत चुकीच्या मार्गाने करीत आले आहेत. त्यामुळे खरे व शाश्वत 'परिवर्तन' होणे अशक्य आहे. फक्त 'निसर्गामुळे' होणारे कष्टप्रद, अत्यंत, (Slow Cosmic Speed) होण्याची शक्यता असेल!! त्याला मानवी धारणेत 'सत्यक्रिया' सत्ययज्ञेची क्षमता वा सहकार खुद्द परमात्म्यालासुद्धा मिळणार नाही. तर मग 'प्रसाद' कसा मिळेल?

या 'संगमयुगाचा' हा मानवी आत्मा व ईश्वरी योजनेचा मुद्दा आहे, हे पक्के जाणून घ्या व ध्यानात मग्न व्हा. कारण ज्याला आपण 'ईश्वरी मदत' म्हणतो ती या 'संगम युग' (System) मध्ये मानवी क्रिया व धारणा या योगक्रियेने 'जागृत व परिणाम करणारी झाल्यावरच (Activate) चालू होणार आहे.

मला कल्पना आहे की या साधनेचा विचार 'तात्विक ज्ञानापेक्षा निराळा कल्पणे' ही चूक आजपर्यंत होत आली आहे. 'संगमयुगात' ज्ञान व क्रिया यांवर संगम आपणच करून आणावयाचा आहे, तरच ईश्वरी इच्छा व मानवी इच्छा (Aspirations) 'अभीप्सांचा' 'Integral Yoga'(Auro bindo and Mother Inspired) होऊ लागेल!!

एकांगी (Exclusive) विचार हे दोषयुक्त आहेत. आपण आतापर्यंत अशाच द्वैत संकल्पनेचा अव्हेर करून (Advanced Integral) कठीण अद्वैत System ला लायक झालेलो नाहीत. भौतिकवादी व अध्यात्मवादींचा योग्य संबंध Inter Relations न लावता त्यामध्ये चुकीचे संघर्ष निर्माण करून धारणा नाकारतो आहोत. ही एक गंभीर चूक जगातील सर्व मानवसमाज करीत असल्याने जागतिक संघर्षाच्या 'मायाजगात' मध्ये सगळ्याच जीवात्म्यांच्या अपेक्षांना अपयश प्राप्त करून देत आहोत. थोडा सूक्ष्म, शांत विचार केल्यावर हे नक्की समजेल!! तेव्हा हे सुधारित ज्ञान व सुधारित साधना, यज्ञ, कर्म क्रिया करण्यासाठी लागणारी दुरुस्ती ह्या नवीन दृष्टीने आवाहन केले आहे. ह्या 'दोन शक्ति' संबंध जागृत केल्यावर आपल्या कर्मांना 'ईश्वरप्रणीत' योजनेची 'दिशा' व ध्येय प्राप्त होईल यात शंका नाही.

सगळ्या मानवी जिवांचा भ्रम या गोंधळलेल्या परिस्थितीचा आहे (Cunfused)

**पुढील विचार**

या चर्चेचा इथेच 'तात्पुरता थांबा' (Stop) करून त्या पुढील विचारांच्या संकल्पनेचा उल्लेख करतो व लेख (क्रमशः) चालू ठेवण्याचा 'संकल्प' करतो. त्या संकल्पना अनुक्रमे खालीलप्रमाणे योजिल्या आहेत.
१) भगवद्गीतेतील अध्याय १ ते १८ मधील दुसऱ्या अध्यायातील ३८ व्या श्लोकापर्यंत जो विचार 'सांख्याचा' आहे व त्यानंतर अध्याय २ श्लोक ३८ (२.३९) पासून पुढचा भाग यांतील (Junction) दिशा बदल' आहे हा!! थोडक्यात 'सांख्य', वेदिक व व्यास निर्मितीने 'गीता योग', भगवद्गीतेचा उपदेश व ज्ञान व क्रिया हा मुद्दा असेल.



२) प्राण वा ब्रह्म संकल्पना व माया जग, पृथ्वीवरील मानवी जीवन, संगमयुगातील मानवी यत्न व क्रिया व कर्म यांची धारणा व त्यातील एकात्मता या संकल्पनेचा विचार करणार आहोत.

आज या दोन दिशांमधील योग्य मार्गाची जाणीव व ज्ञान आवश्यक आहे. इथे हा एक (Signal) आहे किंवा 'दिशा बद्‌ल' आवश्यक आहे.

कारण आपल्या ज्ञानाची, धारणेची, साधनेची (Derailment) रस्त्यांची गल्लत होऊन मार्गभ्रष्ट होऊन आपण चाललो आहोत!!

हे आवाहन करून इथेच लेख थांबवतो!!
॥कृष्णार्पणम् अस्तु॥
(क्रमशः)

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाइल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com

●●●

Let the past be past.
Concentrate only on the Eternal.
The Mother
CWM 15 : 72

The sadhana of inner concentration consists in:

1. Fixing the consciousness in the heart and concentrating there on the idea, image or name of the Divine Mother, whichever comes easiest to you.

2. A gradual and progressive quieting of the mind by this concentration in the heart.

3. An aspiration for the Mother's presence in the heart and the control by her of mind, life and action.

But to quiet the mind and get the spiritual experience it is necessary first to purify and prepare the nature.

Sri Aurobindo



# पाऊले चालती...
# एक जीवनानुभव

*विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त श्री. मा. य. गोखले लिखित 'पाऊले चालती...एक जीवनानुभव' हे पुस्तक रविवार दि. ८ फेब्रुवारी २०१५ रोजी ज्येष्ठ शास्त्रज्ञ - विचारवंत डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते प्रकाशित झाले. या पुस्तकातील श्री. मा. य. गोखले यांचे मनोगत - संपादक*

**लिखाणाचे स्वरूप**

'पाउले चालती...' हे दोन शब्द, माणसांच्या जीवनक्रमाचे सार आहे. हे शब्द, एक प्रवास चालू असल्याचे ध्वनित करतात. हा प्रवास अखंड आहे. कधीही न संपणारा, पण त्याचे गंतव्यस्थान निश्चित आहे. चालणाऱ्याला हे माहीत आहे. ते स्थान तो कधी गाठणार, ते मात्र अज्ञात आहे. अवनीतलावरील प्रत्येक जीवजंतू, प्राणिमात्र, मानवजातसुद्धा याला अपवाद नाही. 'अजुनी वाट चालतचि आहे' असे म्हणत म्हणतच प्रत्येक जण चालत असतो.

प्रत्येक जीवमात्र याच क्रियेत मग्न आहे असे म्हटले तरी, ज्यांना जीव नाही त्या वस्तूसुद्धा त्याला अपवाद नाहीत. पंचमहाभूतांतील कण न् कण अनंताचीच वाट चालत असतो. जरी 'मॅटर इज इंडस्ट्रक्टिबल' असे म्हटले असले तरी, पृथ्वीची निर्मिती जशी झाली, तसाच पृथ्वीला अंतही आहे असे अध्यात्मामध्ये, भौतिक किंवा खगोलशास्त्रामध्ये सांगतात. पण हे सत्य फक्त माणूस या जातीलाच माहीत आहे का? असे आपण तरी समजतो. आपले आयुष्य किती क्षुद्र, किती गौण, किती अल्प, किती क्षणभंगुर आहे हेही आपल्याला माहीत असते. तरीही आपण चालतच असतो.

'पाउले चालती' हे शब्द ज्यांना पावले आहेत, त्यांच्याच बाबतीत लागू पडतात असे नाही. तर जन्माला आलेल्या प्रत्येक जीवजंतूच्या बाबतीत ते खरे आहे. जन्माला आलेला प्रत्येक प्राणिमात्र जन्मापासून गतिमान असतो. ज्या प्राणिमात्रांना पाय आहेत ते सर्व प्राणी जन्मापासून स्वतःच्या पायांवर उभे असतात; फक्त मानवप्राणी सोडून. कोंबडीची, चिमणीची पिलेसुद्धा कवच फोडून बाहेर आली की, पावले चालूच लागतात. चतुष्पाद प्राण्यांचेही थोड्याफार फरकाने तसेच असते. येथे मी पावले हा शब्द न वापरता सर्व ठिकाणी पाउले म्हटले आहे. गाई-म्हशींच्या वासरांचे, रेडकांचे जन्म, आईच्या पोटातून बाहेर येताना अनेकांनी पाहिले असतील. दूरदर्शनद्वारे अगदी हत्तीचे पिल्लूसुद्धा बाहेर येताना आपणांस पाहायला मिळते. हे सर्व प्राणी जन्मल्यानंतर अल्प काळातच चालू लागतात. अगदी श्वानासारखे व त्याच जातीतल्या इतर प्राण्यांचे डोळे उघडलेले नसले तरी ते प्राणी पाउले टाकायला सुरुवात करतात.

फक्त मनुष्यप्राण्याला, पाय असूनही जन्मल्याबरोबर पाउले टाकता येत नाहीत. त्याला वर्ष-सहा महिन्यांचा काळ जावा लागतो. आणि एकदा पाउले टाकायला सुरुवात केली की, त्याला थांबता येत नाही. पुढे उतारवयात, शारीरिकदृष्ट्या तो ''पावले चालायला'' अक्षम झाला तरी आध्यात्मिकदृष्ट्या त्याची ''पाउले चालतच'' असतात. हे प्रत्येक पाऊल काहीतरी नवे अनुभवत असते. प्रत्येक ''पाउलाला'' काहीतरी नवी अनुभूती मिळत असते. प्रत्येक पाऊल नवीन ज्ञान प्राप्त करून घेत असते. अगदी पाय नसलेला पांगळा माणूससुद्धा पाउले चालतच असतो. योगशास्त्रात माणसाच्या आयुष्याबद्दल सांगितले आहे की, माणसांचे आयुष्य पंचांगातील वर्षांप्रमाणे मोजायचे नसते तर तो जन्मभरात किती श्वास घेतो त्यावर अवलंबून असते. सर्वसाधारण माणूस सत्तर वर्षांचा होईपर्यंत पंचावन्न कोटी श्वास घेतो.परमेश्वराने माणसाला जितक्या कोटी श्वासांचा साठा दिलेला असतो, तितकेच श्वास तो जगतो. मग पंचांगाची

वर्षे किती का झालेली असेनात!

तसेच पाउलांचे आहे. आपण किती पाउले चालणार आहोत हे आपणास माहीत नसते. तरीही आपण चालतच असतो. या प्रत्येक पाउलाला काहीतरी कथन करायचे असते. ते जाणून घेण्याची इच्छा, ते समजून घेण्याची आस आपणांस असते. ती कधी व्यक्त होते, कधी अव्यक्त असते. थोड्याफार प्रमाणात प्रत्येकाला स्वतःला त्याची जाण असतेच. ही जाण, हे आकलन, शब्दबद्ध करून दुसऱ्यापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न अनेक जण करीत असतात, करीत राहतील. इतरांना किती समजतील किंवा न समजतील याची काळजी समजून घेणाऱ्याने करावयाची.

अशीच ही काही मी टाकलेली पाउले. ही पाउले सरळ पडलेली आहेत अशी माझी समजूत आहे. ही पाउले धीरोदात्तपणे टाकलेली आहेत, कधी अडखळत पडलेली आहेत, कधी दुसऱ्याचा आधार घेऊन किंवा प्रसंगी दुसऱ्याला आधार देऊन ही पाउले कधी संथ चालतात, कधी धावतात, कधी काही काळ थबकतात, मागे वळून पाहाण्यासाठी, पण थांबत नाहीत. कधी आक्रंदतात, कधी आनंदित होतात, मानवी स्वभावाच्या सर्व छटा ही पाउले व्यक्त करतात. 'ट्रॅव्हलिंग इज हॅपीनेस' असे एका इंग्रजी लेखकाने म्हटले आहे. 'अजुनी वाट चालतोचि आहे.' हा अपूर्ण वर्तमानकाळ आहे. म्हणूनच मला जे काही सांगायचे आहे ते म्हणजे ''पाउले चालती...''

## आठवणींचे भारूड

दोन-एक वर्षांपूर्वी, मी आमचे एक साहित्यिक मित्र श्री. भा. ल. महाबळ यांच्याबरोबर ठाणे ते पुणे असा प्रवास एकाच गाडीतून केला. ते ख्यातनाम लेखक आहेतच, मात्र हलकीफुलकी, रंजक व विनोदी साहित्यनिर्मिती हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. जातायेताना प्रवासात सहा तास व पुणे मुक्कामी पाच तास आम्ही एकत्र होतो. खूप गप्पा झाल्या. त्यांच्या लहानपणापासूनच्या अनेक आठवणींना त्यांनी उजाळा दिला. मीसुद्धा त्याला योग्य तो प्रतिसाद देत माझ्याही आठवणी सांगण्याचा प्रयत्न केला. ''तुम्ही एकंदर किती गावे हिंडला हो आतापर्यंत?'' या त्यांच्या प्रश्नावर मी सांगितले ''खूप गावांत राहिलो व अनेक गावांत हिंडलो. 'हिंडणे' म्हणजे अल्पकाळ भेट देणे, कामानिमित्त जाणे असा अर्थ होतो. पण 'राहणे' म्हणजे पुढील गावाला जाईपर्यंत कायमस्वरूपी व जास्त काळ वास्तव्य असणे'' असा मी खुलासा केला. ''म्हणजे तुम्ही अनेक गावचे पाणी प्यायला आहात तर?'' त्यांची विनोदी टिप्पणी. ''बरोबर आहे. जन्मापासून आतापर्यंत मी एकंदर १७ गावांमध्ये राहिलो. पैकी तीन ठिकाणी दोन वेळा राहिलो. फिरतीच्या कामामुळे कमीतकमी ३० गावांमध्ये प्रत्येकी महिनाभर तरी राहिलो आहे.''

''अरे,वा! तुमच्या लहानपणापासून तुम्हांला जीवनक्रमामध्ये अनेक प्रसंग, किस्से, खोड्या, खेळ, वात्रटपणा, हिंडणे, फिरणे, मार खाणे असे विविध अनुभव आले असतील. शिवाय हे तुमचे अनुभव व तुम्हांला भेटलेली माणसे यांमध्ये वैचित्र्य तर असेलच, शिवाय अनेक मनुष्यस्वभाव व बरेवाईट विविध अनुभव तुमच्या संग्रही असतील.'' माझे मित्र म्हणाले, ''तुम्ही एक काम करा. छोटे-मोठे प्रसंग, संवाद, घटना जे काही आठवेल ते सर्व नोंद करून ठेवा. मग ते क्रमाने लिहावयाचे, की तारीखवार लिहायचे हे नंतर ठरविता येईल.'' ''शेकडो प्रसंग अनुभवले, शेकडो माणसांशी संबंध आला. प्रत्येक माणसाबद्दल दोन-चार पाने तरी लिहिता येईल. त्यातूनच आपले आयुष्य उलगडत जाईल व एक वेगळ्या प्रकारचे आत्मचरित्र सिद्ध होईल.'' असे ते पुढे म्हणाले.

मी मनात म्हटले, प्रयत्न करायला काही हरकत नाही. प्रथम फक्त आठवणींची नोंद तर करून ठेवू. मग त्यांचा क्रम कसा लावायचा, विस्तार केवढा करावयाचा किंवा त्याला संभाषणात्मक रूप देता येईल का ते नंतर ठरविता येईल. निदान आपणांस ओळखणाऱ्या मंडळींना तरी त्या आठवणी वाचण्यास आवडतील. सर्वसाधारणपणे प्रत्येक माणसाचा एक आवडता छंद म्हणजे जुन्या

जीवन नेहमीच अपूर्ण असते आणि ते अपूर्व असण्यातच त्याची गोडी साठवलेली असते.

आठवणांत रमून जाणे. आठवण किंवा आठवणी या शब्दाबरोबर अनेक क्रियापदे जोडली जातात. आठवणी काढणे, आठवणीत रममाण होणे, आठवणी उगाळणे इत्यादी. अनेकांना कोठेही बोलताना आमच्या लहानपणी असे होते, आम्ही शहाण्याप्रमाणे कसे वागत होतो हे सांगत बसण्याचा छंद असतो. मीही त्यांतलाच एक. नवीन पिढीला त्यामध्ये काहीच रस नसतो. त्यांना ते कंटाळवाणे (बोरिंग) वाटते. खरे म्हणजे माणसांच्या जुन्या आठवणी वाचणे म्हणजेसुद्धा कंटाळवाणे वाटल्यास नवल वाटायचे कारण नाही. अशा आठवणींमध्ये सर्वांनाच रस वाटेल असे नाही. प्रस्तुत लिखाण तसेच वाटल्यास त्याचे वाईट वाटून घेण्याचेही कारण नाही. आठवणी सांगत बसण्याचे, आठवणी लिहिण्याचे एक वय असते. त्या वयाच्या पलीकडे आम्ही गेलेलो आहोत. वयाच्या साठीच्या आसपास सर्वसाधारणपणे ''माझी आठवण'', ''साठवण'' अशी शब्दावर कोटी करून अनेकांनी पुस्तके छापलेली आमच्या पाहण्यात आली आहेत. आठवणींची पुस्तके छापणे न छापणे हा प्रत्येकाच्या सोयीचा, आवडीचा तसा ज्याच्या त्याच्या खिशाला परवडण्याचा विषय होऊ शकतो. आठवणींची शेकडो किंवा हजारोंनी पुस्तके धूळ खात पडली असतील. म्हणून इतर कोणी आठवणींच्या नोंदी करून ठेवूच नयेत असे नाही. त्याचा उपयोग इतरांना होवो किंवा न होवो, आठवणी कागदावर उतरविल्यानंतर त्या लिहिणाऱ्या माणसाला तरी काहीतरी लिहिल्याचे समाधान मिळते, हेही नसे थोडके.

पुढचा प्रश्न आला तो म्हणजे या आठवणींचा क्रम कसा असावा? त्यात सुसूत्रता असावी. विषयानुसार आठवणी असाव्या की कालानुसार असाव्या? व्यक्तीनुसार असाव्या, की स्थळानुसार असाव्या, असे अनेक पर्याय डोळ्यांसमोर नाचू लागले. पण शेवटी असे ठरविले की कशाचाही विचार करावयाचा नाही. जसे आठवेल तसे लिहीत जायचे. त्याला जे स्वरूप प्राप्त होईल ते येऊ दे. सर्वांची सरमिसळ झाली तरी हरकत नाही. त्यात अनेकांची व्यक्तीनुसार माहिती असायला हरकत नाही. ते अपरिहार्यच आहे. पुरचुंडीमध्ये कुठे खाने, कप्पे, रकाने असतात का? नाहीतरी ही एक पोतडीच आहे ना. मग 'एक ना धड आणि भाराभर चिंध्या' असे जरी कुणी म्हटले तरी हरकत नाही. ह्या नोंदी फक्त स्वतःच्याच आठवणींवर आधारित असतील असेही नाही. आपल्यापेक्षा वडील माणसांकडून, नातेवाइकांकडून, मित्रांकडून, अशा अनेक स्रोतांकडून मिळविलेल्या अनुभवांचा किंवा माहितीचाही क्वचित ठिकाणी अंतर्भाव झाला असण्याची शक्यता आहे. पोतडी हा जरा गावठी शब्द आहे. गारुड्याची पोतडी असा शब्दप्रयोग आहे. गारुड्याच्या पोतडीतून काय काय निघेल याचा नेम नसतो. पण माझ्याबाबतीत तसे नाही. मी सरळसोट, धोपट मार्गाने लिहीत सुटलो आहे. एखादा उल्लेख अगदी ५०-६० वर्षांपूर्वीचा असेल तर त्याला जोडूनच दुसरा उल्लेख तशाच प्रकारचा, पण अगदी अलीकडचा असेल. मग तिला गोधडी म्हणा किंवा वाकळ म्हणा. या असल्या लिखाणातून संदेश काय मिळणार किंवा वाचणाऱ्यांनी काय बोध घ्यायचा हे प्रश्न ज्याच्या त्याच्यावर सोपवावे हे उत्तम.

### डायरी, काहीही न लिहिण्याची एक कोरी वही

अनेक वेळा इतरांशी बोलताना, गप्पा मारताना कुतूहलाने काही जण पूर्वी काय परिस्थिती होती, किंवा तुमच्या लहानपणी तुम्ही अशा प्रसंगी कसे वागत होता असे प्रश्न विचारतात. मग आपणही सुखावून जातो व काही ना काही सांगत बसतो. अर्थात त्याला सूत्रबद्धता नसते. अशा सूत्रबद्ध आठवणी लिहून त्यांचे संकलन केले म्हणजे त्यालाच कदाचित आत्मचरित्र म्हणण्याचा प्रघात पडला असेल. अशा आठवणी मीही लिहून ठेवाव्या असे अनेकांनी अनेक वेळा सुचविले, पण तसे लिखाण करण्याची आपणास सवय नाही व बऱ्यापैकी लिहिता येत असूनही लिहिण्याचा कंटाळा, आळस, ही कारणे आहेतच; पण लिहिण्यास वेळ नसणे व लिहिण्याचा मूड नसणे हीही कारणे आहेत.  अनेक जणांना रोजनिशी

लिहिण्याची सवय असते, असे बरेच जण सांगत असतात; पण रोजनिशी कशी लिहावयाची याचे शास्त्र मला तरी अवगत नाही व इतर लोक कशी लिहितात हेही मी पाहिलेले नाही. कारण कोणाचीच रोजनिशी मी पाहिलेली नाही. रोजनिशी ही खाजगी बाब आहे व दुसऱ्याची रोजनिशी कोणीही पाहू नये, वाचू नये असा संकेत आहे. हे पथ्य आमच्याकडून आपसूकच पाळले गेले आहे. मी स्वतः रोजनिशी कधीच लिहिली नाही. पण प्रत्येक वर्षी एक जानेवारीच्या आधी ठरवितो की, यापुढे येणाऱ्या एक जानेवारीपासून आपण डायरी लिहावयाची बरे का! मला डायरी कधी विकत घ्यावी लागली नाही. कोणी ना कोणी डिसेंबर महिन्यातच डायऱ्या आणून द्यायचे. त्यांपैकी एक डायरी ठेऊन घेऊन इतर डायऱ्या मी मित्रमंडळीकडे पाठवून देत असे. माझ्याकडे ठेवून घेतलेली डायरीही वर्षभर कोरीच राहत असते. डायरीचा उपयोग आपल्या आयुष्यातल्या बऱ्यावाईट प्रसंगांची नोंद ठेवण्याकरिता होत असेल. आमच्या बाबतीत मात्र कोणाचे टेलिफोन नंबर, नावे, पत्ते यांची नोंद करण्याइतपतच डायरीचा उपयोग होतो. अलीकडे डायरीचा उपयोग डायरी लिहिणाऱ्या माणसास त्याचे आत्मचरित्र लिहिण्यासाठी किंवा त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे चरित्र लिहिण्यासाठी इतरांना होत असेल. माझ्याबाबतीत दोन्हीही बाबी कठीण दिसतात. कारण आत्मचरित्र लिहिण्यासारखे खळबळजनक आयुष्य आम्ही जगलेलो नाही किंवा माझ्या पश्चात माझे चरित्र लिहिण्याचे धाडसही कोणी करणार नाहीत. आणि कोणी तसे धाडस केलेच तर तो आतबट्ट्याचा व्यवहार होईल. काही रीम कागदांची नासाडी होईल. सध्याच्या पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीच्या दृष्टीने वनसंपत्तीची ती उधळपट्टीच होईल. कोणतेही पुस्तक लिहिताना ते इतरांनाही वाचनीय वाटावे असा संकेत आहे. तसे होण्यासाठी जीवनात तशा घडामोडी असणे आवश्यक असते. किंवा इतरांच्या जीवनातील गुपिते जणू आपल्यालाच माहीत आहेत व आपण प्रथमच ती उघडकीस आणत आहोत असा आव आणावा लागतो. माझ्याबाबतीत अशी कोणतीच शक्यता नाही. मग प्रश्न उरतो तो हा की, हे सर्व कशासाठी करायचे? कथा, कादंबऱ्या, कविता, चरित्रे, समीक्षा, अनुवाद असे अनेक प्रकारचे लिखाण करणारे सिद्धहस्त लेखक अनेक आहेत. आपण फक्त त्रोटक, सूत्रबद्ध नसलेल्या आठवणींच्या नोंदी ठेवू शकतो. हवं तर त्याला आठवणींची पुरचुंडी किंवा आठवणींची पोतडी किंवा नुसतीच पोतडी म्हणू या.

जीवनावर परिणाम करणाऱ्या गोष्टी आणि व्यक्ती

प्रत्येकाच्या संपूर्ण आयुष्यावर, विचारसरणीवर, दीर्घकाळ व खोलवर परिणाम करणाऱ्या काही गोष्टी, घटना व व्यक्ती असतात. हे परिणाम वैचारिक असतात. त्याला पुढे कौटुंबिक, सामाजिक, राजकीय स्वरूपही येऊ शकते. अनेक वेळा हे परिणाम व्यक्तिनिष्ठ असतात. त्यांमध्ये भावनांचा भाग मोठा असतो. व्यक्तींवरची श्रद्धा, निष्ठा याला कारणीभूत असतात. स्वामी रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांचे उदाहरण देता येईल. त्यामध्ये वैचारिक व आध्यात्मिक भाग होताच, शिवाय गुरूंवरचा दृढ विश्वास काय बदल घडवू शकतो याचे ते उत्तम उदाहरण आहे. हे उदाहरण फारच वरच्या दर्जाचे झाले. आपल्या जीवनावरही अशाच अनेक लहानमोठ्या व्यक्ती परिणाम घडवत असतात व त्याप्रमाणे जीवनाला वळण मिळते.नातेवाइकांचे संबंध प्रथमतः भावनिक असतात. मात्र ते वैचारिकही असू शकतात. दोन्ही ठिकाणी निष्ठेचा, विश्वासाचा संबंध येतोच. डॉक्टरांच्या बाबतीत सांगतात ना, डॉक्टरांवर व ते देत असलेल्या उपचारांवर दृढ विश्वास असेल तर चांगले परिणाम लवकर दिसण्याची शक्यता असते. तसेच इतरांचे असते. त्यामुळेच माणसाचे ज्ञान विस्तारत जाते. अर्थात माणसाचे वय व अनुभव या गोष्टी जशा वाढत जातील त्या प्रमाणात त्याचे जीवन घडत जाते. पण व्यक्तीबद्दल बोलायचे झाले तर काही व्यक्तींच्या आठवणी फारच दीर्घकाळ प्रत्येकास साथ देतात. त्या आठवणी विसरणे कठीण होते.

जगात सारी सोंगे करता येतात, पण पैशाच सोंग करता येत नाही.

या सर्व विवेचनाला मी अपवाद असू शकत नाही. माझ्याही जीवनावर अनेक व्यक्ती, घटना, विचार यांचा एकत्रित परिणाम निश्चित झालेला असणार. अशा व्यक्तींबद्दलच बोलायचे झाल्यास मुख्यतः तीन व्यक्तींचा उल्लेख करावा लागेल. आमच्या वयाच्या २०-२१ वर्षांपर्यंतचा मामांचा म्हणजे आमच्या पिताजींचा सहवास. त्यानंतर म्हणजे आमची आक्का (आई) व विवाहानंतर आईबरोबरच पत्नी यांचा प्रदीर्घ काळाचा सहवास. दुर्दैवाने या तीनही व्यक्ती आता हयात नाहीत. पण त्या सर्वांची आठवण नेहमीच येत असते. मला स्वप्ने खूप पडतात. म्हणजे अगदी सतावतात. पण या तिन्ही व्यक्ती अधूनमधून माझ्या स्वप्नात आपले अस्तित्व जाणवून देत असतात.

आमची आई जाऊन आता (म्हणजे २०१४ साली) २१ वर्षे झाली, पत्नी तर आता आता गेली, म्हणजे नऊ वर्षे झाली. त्या दोघीही स्वप्नात दिसतात, पण मामांना (वडील) जाऊन ६१ वर्षे झाली तरी ते अजून स्वप्नात येतात. इतक्या खोलवर स्मृतीमध्ये घर करून बसणाऱ्या घटना असू शकतात याची प्रचिती वरच्यावर येत असते. त्यामुळे या आठवणी लिहिताना वेगवेगळ्या ठिकाणी त्या त्या व्यक्तींच्या संबंधातील आठवणींचा किंवा संबंधांचा उल्लेख केलाच आहे, पण त्या त्या व्यक्तींसंबंधी व त्या व्यक्तींच्या जीवनपटासंबंधी सलगपणे लिहिल्यास त्या त्या व्यक्तींचे जीवन तर कळेलच, शिवाय माझ्याशी कशा प्रकारचा संबंध आला हेसुद्धा उलगडत जाईल. आपणाशी ज्यांचा ज्यांचा संपर्क आला त्या सर्वांबद्दल असे लिहिता येणे शक्य असले तरी त्याची जरूर वाटत नाही. त्यांची प्रसंगानुरूप दखल घेतली तरी पुरे; पण काहींच्या बाबतीत तरी स्वतंत्र व सलग आठवणींची नोंद करावीशी वाटते.

### अनुभवांचे टप्पे, एक मुक्त चिंतन

सर्वसाधारणपणे अशा तऱ्हेचे लिखाण करताना कालानुक्रमानेच प्रसंग किंवा वर्णन लिहिण्याची पद्धत आहे. इतिहास लिहिताना एखादा राजा राज्यावर आल्यापासून त्यानंतरच्या त्याच्या जीवनात घडलेले सर्व प्रसंग एकापाठोपाठ लिहिण्याचा प्रघात आहे. इतरांची चरित्रे लिहिताना सर्व घटनांचा क्रमाने उल्लेख येत असतो. या माझ्या आठवणींच्या बाबतीत तसेच होणार आहे. या माझ्या वैयक्तिक आठवणी असल्याने माझ्या जन्मापासून आजपर्यंतच्या माझ्याशी संबंध आलेल्या व्यक्तींचे व प्रसंगांचे वर्णन येणारच, पण त्यामध्येही माझ्या दृष्टीने काही ठळक टप्पे निश्चित केले आहेत. हे टप्पे मी ज्या ज्या गावी होतो, त्या त्या गावांतील मुक्कामांच्या काळाप्रमाणेच आहेत. म्हणजे त्या गावी असताना ज्या व्यक्तीशी संबंध आला त्या व्यक्तीसंबंधी एकदा लिहिण्यास सुरुवात केली की, त्या व्यक्तीसंबंधी, त्या व्यक्तीशी संबंधित घटनांचा उल्लेख त्या गावापुरताच मर्यादित न राहता त्यानंतरच्या पुढच्या कालखंडामध्येही असेल. म्हणजे त्या व्यक्तीचे वर्णन एकापेक्षा जास्त कालखंडांत किंवा आजपर्यंतच्या सर्वच कालखंडांमध्ये आढळेल व आताच्या म्हणजे सध्याच्या काळाचाही असेल.

माझा जन्म जमखंडीचा. म्हणजे जमखंडीपासून सुरुवात करून आम्ही जमखंडी सोडून दुसरीकडे जाईपर्यंतचा एक सलग भाग. वयाच्या पाचव्या वर्षापर्यंतचा, १९३६ पर्यंतचा पहिला भाग होईल. त्यानंतर आम्ही मॅट्रिक होईपर्यंतचा कुंदगोळ या गावी असलेल्या मुक्कामाचा दुसरा भाग. त्यामध्ये आमचे प्राथमिक शिक्षण, हायस्कूलमधील शिक्षण, आमचे खेळ, मित्र, आमचे बालपणाचे जीवन यांचा समावेश असेल. त्यानंतरचा तिसरा टप्पा म्हणजे कॉलेजशिक्षणाचा. हुबळी या शहरामध्ये असलेल्या मुक्कामाचा. चौथा कालखंड म्हणजे कॉलेज संपल्यानंतरचा जमखंडीमधल्या अल्पकाळ वास्तव्याचा आणि नोकरीसाठी प्रथमच बाहेर पडल्यानंतरचा. बेळगाव, घटप्रभा अशा ठिकाणी झालेल्या वास्तव्याचा. महाराष्ट्रातील सातारा, नांदेड, नगर, नागपूर, अमरावती अशा विविध ठिकाणच्या मुक्कामाचा असेल. दरम्यानच्या काळामध्ये आमचे लग्न झाल्याचा एक

महत्त्वाचा टप्पा यामध्येच असेल. अशा प्रकारे हा नोकरीचा कालखंड १९६७-६८ पर्यंतचा असेल. पुढच्या कालखंडामध्ये मी नोकरीत असतानाच उद्योगधंदा सुरू केला त्याचा समावेश असेल. त्यानंतर औपचारिकरीत्या १९७२ पासून मी नोकरी सोडली असली तरी १९६७-६८ पासून १९७८ पर्यंतचा, बांधकाम व्यवसाय सुरू करून त्यामध्ये जम बसविण्याचा टप्पा असेल. त्यानंतरचा कालखंड बांधकाम व्यवसायाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक घटनांशी संबंधित असेल, तो कालखंड बँकेशी संबंधित असेल. प्राच्यविद्या अभ्यास संस्थेशी असेल, विद्या प्रसारक मंडळ या शिक्षणसंस्थेशी असेल, कौपीनेश्वर न्यासाशी असेल, मराठी ग्रंथ संग्रहालयाशी असेल किंवा इतर अनेक संस्थांशी असेल. पुढे इतर अनेक संस्थांच्या घडामोडांशी निगडित असेल.

अशा तऱ्हेने जवळजवळ ऐंशी वर्षांचा आढावा घेणारा हा वृत्तान्त असेल. यामध्ये अनेक व्यक्तींचा, घटनांचा, प्रसंगांचा व स्थळांचा उल्लेख असेल. प्रत्येक व्यक्तीचे किंवा घटनेचे वर्णन सलग नसेलही. या प्रदीर्घ कालखंडात शेकडो व्यक्तींचा, नातेवाइकांचा, मित्रांचा संबंध आला. या सर्व अनुभवांचा क्रम उपरोल्लेखित टप्प्याटप्प्याप्रमाणेच ग्रथित केला असला तरी सर्वच अनुभव त्याच क्रमाने असतील असे नाही. त्यांचा क्रम मागे-पुढे होऊ शकेल. म्हणजे इसवीसनांचाच संदर्भ घ्यायचा झाला तर १९३७-३८ च्या आठवणीनंतर लगेचच एखादी आठवण त्याच प्रकारची पण तीस-चाळीस वर्षांनंतरची असेल, तरी त्या दोन्ही एकत्र दिसतील. आठवणीचे स्वरूप हे सूत्र मानून त्याप्रमाणे नोंदी केल्या आहेत. म्हणजे मराठी तिसरीमधली एखाद्या विषयाची आठवण सांगताना त्यालाच जोडून मॅट्रिकमध्ये असतानाची किंवा इ.स. २००० नंतरचीही आठवण जोडली गेली असेल. कॉलेजमधली एखादी घटना सांगताना त्याच प्रकारची इंग्रजी तिसरी-चौथीतील एखादी घटना एकत्र आलेली असू शकेल. या लिखाणाचा हेतू माझ्या वैयक्तिक आठवणी माझ्या स्मरणशक्तीच्या आधारे ग्रथित करण्याचा असल्याने सर्वांच्या पसंतीस त्या उतरतीलच याची हमी देणे मला कठीण आहे. तरीही कोणत्याही वाचकास त्या बाजूला साराव्या असे वाटणार नाही अशी मी आशा करतो. या आठवणींच्या क्रमांना आणखी एक पैलू संभवतो. कॅलेंडरप्रमाणे वर्षांचा क्रम, शाळेच्या इयत्तेप्रमाणे क्रम, वेगवेगळ्या गावांचा क्रम, इतर भौगोलिक स्थळांचा क्रम, पर्यटनस्थळांचा क्रम, उत्सव-समारंभांचा क्रम, सभासंमेलनांचा क्रम असे असंख्य क्रम असू शकतात. त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाचा संदर्भ व्यक्तींचा, नातेवाइकांचा, मित्रांचा, संपर्कात येणाऱ्या समाजातील घटकांचा म्हणजे माणसांचा. आपल्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक माणसाबरोबर आपले वेगवेगळ्या स्तरावर विविध छटांचे, भावनांचे, विचारांचे, कधी जुजबी, औपचारिक, कधी घनिष्ठ, कधी नाजूक हितसंबंध निर्माण झाले असतात. या आठवणी लिहिताना अशा अनेक व्यक्तींचा उल्लेख येणे क्रमप्राप्त आहे. काही वेळा एखादी घटना नोंदताना, प्रसंग लिहिताना काही व्यक्तींचा नुसताच उल्लेख असेल, काहींच्याबद्दल आठ-दहा वाक्ये असतील, किंवा एक-दोन पानेसुद्धा खर्ची पडली असतील. पण काहींचे संबंधच असे असतील की त्यांच्यासाठी विस्ताराने वेगळी प्रकरणेच लिहावी लागतील. त्यांमध्ये त्या व्यक्तींबद्दलचे अनेक प्रसंग, घटना असतीलच. या पोतडीच्या वाचकांच्या माहितीसाठी हे अतिविस्ताराने लिहिणे आवश्यक वाटले. या आठवणी म्हणजे एखादा निबंध किंवा प्रबंध नसून ते एक मुक्त चिंतन आहे. त्यामुळे असा विस्कळितपणा क्षम्य आहे, अशी आशा करायला हरकत नाही ना?

**'पाऊले चालती... एक जीवनानुभव'**
लेखक : **मा. य. गोखले**
पृष्ठ : ६६८, किंमत : रु. ५००/-
प्रकाशक : व्यास क्रिएशन्स्, डी-४, सामंत ब्लॉक्स, घंटाळी मंदिर पथ, नौपाडा, ठाणे (प.)
भ्रमणध्वनी : ९९६७८३९५१०

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, प्राथमिक विभाग

### गणेशोत्सव

दर वर्षीप्रमाणे ह्या वर्षीसुद्धा आमच्या प्राथमिक विभागाच्या प्रांगणात दि. २७/०८/२०१४ रोजी गणेशाचे आगमन मोठ्या थाटात झाले. दि. २९/०८/२०१४ रोजी गणेशाची यथासांग पूजा झाली. रविवार दि. ३१/८/२०१४ रोजी गणेशाला निरोप देण्यात आला. गणेशोत्सवानिमित्ताने इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांची चित्रकला, पाठांतर स्पर्धा घेण्यात आल्या. अथर्वशीर्ष पाठांतर स्पर्धा घेण्यात आल्या.



### शिक्षकदिन

स्वतंत्र भारताचे पहिले उपराष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा जन्मदिवस म्हणून 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. शासनाच्या आदेशानुसार मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण बालसभा घेऊन सामुदायिक ऐकविण्यात आले.

### शारदोत्सव

आश्विन महिन्यात 'दसरा' सण येतो. आम्ही दि. २४.९.२०१४ ते ३.१०.२०१४ या कालावधीत देवीचा उत्सव मोठ्या थाटात साजरा केला. शारदोत्सवानिमित्ताने इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांच्या हस्ताक्षर, चित्रकला, भेटकार्डे, स्मरणशक्ती स्पर्धा घेण्यात आल्या. बुधवार दिनांक १/१०/२०१४ रोजी विद्यार्थ्यांचा भोंडला व पाटीपूजन घेण्यात आले. भोंडल्याची पारंपरिक गाणी व महत्त्व सांगितले.

### म. गांधी जयंती (२ ऑक्टोबर)

गुरुवार २ ऑक्टोबर २०१४ रोजी राष्ट्रपिता म. गांधी जयंती साजरी करण्यात आली. मा. मुख्याध्यापिका सौ. भंडारेबाईंनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व सांगितले. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आदेशावरून २ ऑक्टोबर 'स्वच्छ भारत अभियान' निमित्ताने पंतप्रधानांनी दिलेली शपथ विद्यार्थ्यांना वाचून दाखविली. विविध उपक्रम घेतले. 'स्वच्छता पाळा, रोगराई टाळा'; 'एक दोन तीन चार, स्वच्छतेचा करू विचार' अशी घोषवाक्ये म्हणवून घेतली.

### बालस्वच्छता अभियान (११/११/१४ ते १९/११/१४)

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आदेशानुसार मंगळवार दि. ११/११/१४ ते बुधवार दि. १९/११/१४ बालस्वच्छता अभियान सप्ताह साजरा केला. मंगळवार दि. ११/११/१४ रोजी 'शिक्षण दिन' साजरा झाला. विद्यार्थ्यांना त्याचे महत्त्व सांगितले. १४ नोव्हेंबर रोजी बालदिनानिमित्त इ. ४ थीच्या विद्यार्थ्यांची नेहरूंच्या जीवनावर आधारित प्रसंग निबंधस्पर्धा घेण्यात आली. इ. १ ली ते २ री च्या विद्यार्थ्यांनी कचराकुंडीचे चित्र काढून रंगविले. स्वच्छतेसाठी पाण्याचे उपयोग या विषयावर सुंदर चित्र काढले. इ. ३ री च्या विद्यार्थ्यांची 'गाडगेबाबा व स्वच्छतेचे महत्त्व' या विषयावर निबंधस्पर्धा घेण्यात आली. दि. १७/११/१४ रोजी इ. १ ली ते ४ थीच्या मुलांनी वर्गसजावट केली. घोषवाक्ये, रांगोळी काढून वर्ग छान सजवले. अशा रितीने बालसप्ताह साजरा करण्यात आला.

### क्रीडास्पर्धा

दि. १/१२/१४ ते ५/१२/१४ या दरम्यान इ. १ ली ते ४ थी च्या क्रीडास्पर्धा घेण्यात आल्या. उदा. अडथळा शर्यत, लंगडी घालून चालणे, १०० मी. धावणे, तोल सांभाळून वस्तू नेणे इ. स्पर्धा घेण्यात आल्या.

### शैक्षणिक सहल

बुधवार दि. १७/१२/१४ रोजी इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल 'युसूफ मेहेरअली सेंटर' पनवेल येथे नेण्यात आली. विद्यार्थ्यांना खेडेगावाचा आनंद सहलीत मिळाला. विद्यार्थ्यांना तेलनिर्मिती, साबण बनवणे, बेकरी, कुंभारकाम इ. लघुउद्योगांची माहिती प्रात्यक्षिक दाखवून देण्यात आली. नंतर खेळण्याचा मनसोक्त आनंद विद्यार्थ्यांना मिळाला.

### वार्षिक स्नेहसंमेलन

सोमवार दि. १५/१२/१४ रोजी शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून लेखक श्रीयुत बागूल सर लाभले होते. अध्यक्षा सौ. सुमेधा बेडेकर उपस्थित होत्या. कार्यक्रमात प्रास्ताविक, पाहुण्यांची ओळख, पाहुण्यांचे भाषण, अध्यक्षांचे भाषण व मा. मुख्याध्यापिका भंडारेबाईंचे भाषण झाले. बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे व अध्यक्षांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. 'विविध रंग' या विषयावर सर्व इयत्तांतील मुलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.



### शालाबाह्य स्पर्धा

इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. आकृती कला मंच, कला ॲकॅडमी, धार्मिक पाठांतर स्पर्धा, स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त पाठांतर स्पर्धा, प्रारंभ कला ॲकॅडमी अशा विविध स्पर्धांमध्ये इ. १ ली ते ४ थी च्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी आकृती कला मंच या चित्रकला स्पर्धेत, हस्ताक्षर स्पर्धेत २ व निबंध स्पर्धेत एका विद्यार्थ्याला सिल्व्हर मेडल मिळाले व इतर मुलांना प्रशस्तिपत्रके देण्यात आली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

मार्च २०१४ मध्ये झालेल्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आपल्या शाळेचा निकाल ८०% लागला असून कु. ओजस अशोक मेंगडे २६४ गुणांसह जिल्ह्यात सातवा आला.

सप्टेंबर २०१४ झालेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत आपल्या शाळेतील इ. ६ वी मधील १) ओम पाटील २) समर्थ पाटील ३) ऋचा जोशी ४) प्रज्ञा मोरे व इ. ९ वी मधील कौस्तुभ भुरे या विद्यार्थ्यांची प्रयोग परीक्षेसाठी निवड झाली.

राष्ट्रीय बालविज्ञान परिषद २०१४ अंतर्गत आपल्या शाळेतील इ. ७ वीच्या मुलांनी सादर केलेल्या प्रकल्पाची निवड राष्ट्रीय पातळीसाठी झाली. प्रकल्पाचे नाव वाहनांतून बाहेर पडणाऱ्या धुरातील घटकांचा हवेवर होणारा परिणाम अभ्यासणे. सहभागी विद्यार्थी -

१) मयुरेश पाटील २) पूजा आसवले ३) नारायण गवस ४) यश खेराडे ५) अद्वैत जोशी

मार्गदर्शक शिक्षक - सौ. उज्ज्वला धोत्रे, श्री. संजय दिघे

### श्रीमती जानकीबाई गोखले गीता पठण स्पर्धा

विद्या प्रसारक मंडळ ठाणे यांचे विद्यमाने रविवार दिनांक १६/११/२०१४ रोजी घेण्यात आली.

सदर स्पर्धेत आपल्या शाळेतील कु. ऋचा जोशी हिला

जीवन हा एक पाण्याचा प्रवाह आहे, समुद्र गाठायचा असेल, तर खाचखळगे पार करावेच लागतील.

लहान गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### विविधरंगी डिसेंबर

डिसेंबर हा थंडीचा, निसर्गसौंदर्याचा आणि शाळेतील विविध उपक्रमांचा महिना. चालू वर्ष संपून नवीन वर्ष सुरू होण्याची वाट बघण्याचा महिना. या महिन्यातील काही उपक्रम -

### २० डिसेंबर २०१४ - वार्षिक स्नेहसंमेलन

ज्युनियर आणि सीनियर के.जी.च्या मुलांचे वार्षिक स्नेहसंमेलन शनिवार २० डिसें. रोजी सकाळी ९.३० वाजता पार पडले. शिक्षकांनी विविध भाषांतील गाण्यांची निवड केली होती. विभागप्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी वार्षिक अहवाल व विविध उपक्रम यांची माहिती देणारे प्रास्ताविक दिले. या वयाच्या मुलांकडून नृत्य करून घेणे, त्यांची गैरहजेरी या व इतर अडचणींची कल्पना आपल्या प्रास्ताविकातून सौ. मुळगुंद यांनी पालकांना दिली. यानंतर आमच्या चिमुकल्यांनी सुरेल गाण्यांवर नृत्याचे सादरीकरण केले. पालकांनी मुलांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले.

### २३ डिसेंबर - नाताळ

२५ डिसेंबरला जगभर साजरा होणारा नाताळ आम्ही २३ डिसेंबरला शाळेत साजरा केला. वर्गात येशू ख्रिस्ताच्या जन्माची कथा सांगणारा देखावा, चांदण्या, ख्रिसमसचे झाड मांडले होते. आम्हां शिक्षकांपैकी एक सांताक्लॉजचा वेष परिधान करून आली. सर्व मुलांबरोबर सांताने गाणी गायली. नाच केला. या निमित्ताने मुलांना केकचा गोड खाऊ दिला गेला. विविधरंगी कपडे घालणारी आमची चिमुकली सर्वांना नाताळच्या शुभेच्छा देत आनंदाने घरी गेली.

### २४ डिसेंबर २०१४ - बाजारहाट

सीनियर केजी.च्या मुलांना त्यांच्या अभ्यासक्रमात चलनातील नोटा, नाणी यांचा परिचय करून दिला जातो. याचीच एक प्रत्यक्ष कृती म्हणजे बाजारहाट. मुलांनी बनवलेल्या काही वस्तू; जसे पाकिटे, पिशव्या व खाऊ खेळणी यांनी बाजार नटला. सीनियरची काही मुले शिक्षकांसोबत दुकानदार झाली व ज्युनियरची मुले खरेदी करण्यासाठी बाजारात आली. छोट्या मुलांचा हा बाजार सर्वांनाच भावला.

### क्रीडादिन

शुक्रवार २६ डिसेंबर-ज्युनियर
शनिवार २७ डिसेंबर - सीनियर

या वर्षी ज्युनियरचा क्रीडादिन शुक्रवार २६ डिसें. रोजी शाळेच्या आवारात घेण्यात आला. या मुलांसाठी धावण्याची शर्यत व पुस्तक डोक्यावर ठेवून चालणे असे खेळ घेतले. सर्वच विजेते या भावनेने सर्वांनाच बक्षीस म्हणून रंगपेटी देण्यात आली.

शनिवारी २७ डिसेंबरला सीनियरचे विविध क्रीडाप्रकार घेतले गेले. धावण्याची शर्यत, जलद गतीने चालणे तसेच अडथळ्यांची शर्यत अशा विविध प्रकारांत मुलांनी उत्साहाने भाग घेतला. सर्वांना बचत पेटी (Piggy Bank) बक्षीस म्हणून दिली गेली.

### विशेष

संस्कृती कलादर्पणतर्फे मुलांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी अनेक स्पर्धा घेतल्या जातात. या वर्षी आमच्या शाळेतर्फे 'रामायण' नावाचे नाटुकले तसेच 'गणा धाव रे' या गाण्यावरचे नृत्य अशा दोन सादरीकरण झाले. यापैकी नाटकाला प्रथम तर नृत्याला द्वितीय बक्षीस मिळाले, तर सोहम अभ्यंकर या रामाची भूमिका करणाऱ्या बालनटाला सर्वोकृष्ट नट म्हणून पारितोषिक दिले गेले.

### शशी जोशी आंतरशालेय नाट्यस्पर्धा

आमच्या मुलांनी 'गोंधळी राजाची सफळ कहाणी'

हे नाटक सादर केले व खालील पारितोषिके मिळवली.

१) उत्कृष्ट नाटक व प्रेक्षक पसंती पारितोषिक
२) उत्कृष्ट नायिका - सानिका जोशी
३) उत्कृष्ट नायक : दुसरे बक्षीस- सागर रळेगावकर
४) उत्कृष्ट दिर्ग्दशक - सौ. प्रियंका भांगले
५) उत्कृष्ट लेखक - सौ. वीणा जोशी

**स्वामी विवेकानंद वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी खालील पारितोषिके मिळवली -**

| क्र. | भाषा | गट | विद्यार्थ्याचे नाव | क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | इंग्रजी | ५ वी-६ वी | साशा गोरे | ३ रा |
| | | ७ वी-८वी | अमेय दानोळे | १ ला |
| | | | मैत्रेयी भारती | ३ रा |
| २. | मराठी | ७ वी-८वी | सुचित गुप्ते | ३ रा |
| ३. | हिंदी | ७ वी-८वी | शरगुनदीप कौर सचदेव | ३ रा |

• ११ स्काउट व दहा गाईड यांनी पालघर येथील राज्य मेळाव्यात भाग घेतला. त्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम, चित्रकला स्पर्धा, रंग भरणे स्पर्धा व पाककला स्पर्धा या स्पर्धांत पाच चषक मिळविले. त्यांची नावे :

| स्काउट | गाइड |
|---|---|
| प्रिन्स मित्रा | मैत्रेयी कुलकणी |
| सोहम शिंपी | खुशी जोशी |
| विश्वराज बोरकर | ज्ञानदा जोशी |
| वरदराज कर्वे | प्रचिती दामले |
| अभिषेक कुलकर्णी | जागृती पवार |
| श्रीराज आंबवणे | उर्वी पाटील |
| स्वानंद लेले | समृद्धी करंदीकर |
| ऋग्वेद लांघी | सिद्धी कानेटकर |
| ओंकार हटकर | प्रार्थना वारे |
| सिद्धेश वाळंज | दृष्टी सावला |
| अभिजित सामंत | |

**युनिफाइड आंतरराष्ट्रीय इंग्रजी ऑलिम्पियाड २०१४ -१००% निकाल :**

खालील विद्यार्थ्यांनी पहिल्या शंभरांत क्रमांक मिळवला.

१) अदिती गोरे-१४ वा २) ईशा पुणतांबेकर-२० वा
३) ध्रुव क्रिशनन-३७ वा ४) सानिका गोरे-६३ वा
५) विद्या धोपाटे-७४ वा ६) रेणुका भट-९३ वा

**क्रीडा**

मानस कुलकर्णीने १५ व्या KBI नॅशनल कराटे चॅम्पियनशिप कोईम्बतूर येथील स्पर्धेत कांस्यपदक मिळवले.

**भूगोल प्रज्ञा शोध परीक्षा २०१४ चा निकाल : १००%**

एकूण विद्यार्थि संख्या - २३
उत्तीर्ण विद्यार्थि संख्या - २३
सर्वाधिक गुण मिळवणारे विद्यार्थी

१) मिहीर गोरे : इ. ५ वी - ८२ गुण
२) इशान मलिये : इ. ६ वी - ७८ गुण
३) जिनव गाला : इ. ७ वी - ७८ गुण
४) अमेय दानोले : इ. ८ वी - ७८ गुण
५) शांभवी जोशी : इ. ९ वी - ८२ गुण
६) सानिका कुलकर्णी : इ. १० वी - ६८ गुण

**'आय क्विज-स्मार्ट क्विज' या प्रश्नमंजुषेच्या स्पर्धेचा निकाल :**

खालील विद्यार्थ्यांच्य संघाने पहिला क्रमांक पटकावला-

१) विश्वराज बोरकर
२) सुश्रुत अकेरकर
३) सोहम सांगलीकर
४) वरुण गोडबोले

## जोशी बेडेकर महाविद्यालय

### राष्ट्रीय परिषदेचा वृत्तान्त

ठाणे येथील के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय येथील महिला विकास कक्षाने दि. ९ जानेवारी व १० जानेवारी रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेचा विषय 'भारतीय स्त्रियांची समानतेची आस - वचने समस्या व भवितव्य' असा होता.

या परिषदेचे उद्‌घाटन मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. देश प्रगतिपथावर न्यायचा असेल तर स्त्री सबलीकरण व सक्षमीकरणाची आवश्यकता त्यांनी नमूद केली. तसेच विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर वडिलांप्रमाणे आईचेही नाव असावे हा पुरोगामी निर्णय घेतल्याचे सांगितले. या परिषदेसाठी उपस्थित सर्वांचे स्वागत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. शकुंतला अ. सिंह यांनी केले. तर परिषदविषयक प्रास्ताविक परिषदेच्या समन्वयक प्रियंवदा टोकेकर यांनी केले. या उद्‌घाटनपर सत्राचे सूत्रसंचालन सौ. तन्वी राऊत यांनी केले तर आभारप्रदर्शन परिषदेच्या उपसमन्वयक डॉ. सुजा रॉय अब्राहम यांनी केले. सत्राच्या सुरुवातीस विद्यार्थिनींनी 'ले कंधों पर आकाश' हे उद्‌घाटन पर गाणे म्हटले.

याच सत्रात परिषदेच्या विषयाच्या अनुषंगाने आलेल्या शोधनिबंधाच्या मासिकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्या डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात 'स्त्री-पुरुष समानता - वास्तव की आभास' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यात ॲडव्होकेट जाई वैद्य, मावा (MAVA) या संस्थेचे संस्थापक हरीश सदानी व डाटामेटिक्स या कंपनीच्या उपाध्यक्षा सौ. वरद कामिनी अरोरा हे मान्यवर सहभागी झाले होते. त्यांच्याशी सुसंवाद साधण्याचे काम ज्ञानसाधना महाविद्यालयातील प्राध्यापिका सीमा केतकर यांनी केले. कायद्यात, आर्थिक क्षेत्रात समाजात बदल घडत आहेत. परंतु खरी आवश्यकता आहे ती मनोभूमिका बदलण्याची हा विचार या सर्वांनी व्यक्त केला.

तिसऱ्या सत्रात सुप्रसिद्ध गणिततज्ज्ञ व लेखिका सौ. मंगला नारळीकर यांनी 'स्त्रिया आणि शैक्षणिक संधी' या विषयावर विचार व्यक्त केले. देश-विदेशात त्यांना आलेल्या विविध अनुभवांचे कथन करत त्यांनी हा विषय उलगडला.

परिषदेचे चौथे सत्र तांत्रिक स्वरूपाचे होते व त्यात विविध शोधनिबंध वाचले गेले. मुद्दाम नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे हे शोधनिबंध भारताच्या विविध भागांतून तसेच महाराष्ट्रातील विविध भागांतून आले होते. शोधनिबंधांची संख्या मोठी असल्यामुळे एकाच वेळी तीन वेगवेगळ्या सभागृहांत हे शोधनिबंध वाचले गेले. पहिल्या दिवशी 'स्त्रिया व कायदा, स्त्रिया व आरोग्य आणि माध्यमे आणि स्त्रिया' या विषयांवरील निबंध वाचले गेले. याअंतर्गत स्त्रियांविषयीचे कायदे व घटनात्मक तरतुदी, घटता लिंगदर, योगाचे आरोग्यातील महत्त्व, माध्यमांतील स्त्रीदर्शन अशा विविध विषयांबरील निबंध वाचण्यात आले. या सत्राअंतर्गत 'स्त्रिया व कायदा' यासाठी डॉ. बिंदू वारिआथ, उपप्राचार्या, के. सी. महाविद्यालय; 'स्त्रिया व आरोग्य' यासाठी डॉ. उल्का नातू व 'माध्यमे आणि स्त्रिया' या सत्रासाठी सौ. वृंदा मोघे यांनी अध्यक्षपद भूषविले.

दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात आणखी काही शोधनिबंध वाचले गेले. 'सामाजिक व राजकीय मुद्दे आणि स्त्रिया', 'स्त्रियांशी निगडित विविध मुद्दे व स्त्री सक्षमीकरण उद्देशाने केलेल्या उपाययोजना' या शिर्षकांतर्गत विविध निबंध वाचले गेले. ॲडव्होकेट माधवी नाईक, मुंबई विद्यापीठाच्या महिला विकास कक्षाच्या अध्यक्ष डॉ. क्रांती जेजुरकर व प्रा. सीमा केतकर यांनी या तीन सत्रांचे अध्यक्षपद भूषविले. एकूण ५१ शोधनिबंधांचा समावेश

मासिकात करण्यात आला आहे.

दुसऱ्या सत्रात एस. एन. डी. टी. विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या विभागप्रमुख डॉ. विभूती पटेल यांनी 'जेंडर बजेटिंग व स्त्री सक्षमीकरण' या विषयावर विचार व्यक्त केले. ही संकल्पना त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितली.

यापुढील सत्र 'विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती' असे होते. या परिषदेच्या निमित्ताने ऑगस्ट महिन्यात विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यांतील काही विजेत्यांनी परिषदेत सादरीकरण केले.

तिसऱ्या सत्राचा विषय 'समतेकडे वाटचाल' असा होता. यात स्त्रीमुक्ती संघटनेच्या संस्थापक ज्योती म्हापसेकर, सामाजिक कार्यकर्ते डॉ. भीमराव गस्ती आणि ॲडव्होकेट सुरेखा दळवी व 'प्रथम' या संस्थेच्या संस्थापक श्रीमती फरिदा लांबे सहभागी झाल्या. या सर्वांना बोलते करण्याचे काम महाविद्यालयातील प्राध्यापिका व समुपदेशक सुचित्रा नाईक यांनी केले. त्यांच्या संवादातून या कार्यकर्त्यांना असणारी कामाची तळमळ, त्यांना आलेल्या समस्या, त्यांचे विचार उपस्थितांसमोर मांडले गेले.

या परिषदेच्या सांगता समारंभासाठी सौ. सुमेधा विजय बेडेकर उपस्थित राहिल्या. या विषयावरील तज्ज्ञ तसेच कार्यकर्ते यांच्या सत्रानंतर सौ. बेडेकर यांनी एखाद्या स्त्रीला सर्व कुटुंबाची वीण विणताना कोणत्या कसरती कराव्या लागतात, कोणत्या अनपेक्षित प्रसंगांना सामोरे जावे लागते; परंतु त्याच वेळी आपला छंद जोपासणे व हॉस्पिटलचे काम बघणे हेही साधणे आपण कसे शक्य केले याचे कथन केले. गद्याबरोबरच पद्याचा वापर करून त्यांनी आपला विषय उलगडला.

यानंतर परिषदेसाठी आलेल्या सहभागी सदस्यांनी परिषदविषयक विचार व्यक्त केले. परिषदेच्या समन्वयक प्रा. प्रियंवदा टोकेकर यांनी आभारप्रदर्शन केले.

महिला विकास कक्षाच्या अध्यक्ष व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला अ. सिंह यांच्या अमूल्य मार्गदर्शनाखाली ही परिषद पार पडली. तसेच महिला विकास कक्षाच्या सर्व सदस्यांच्या सहकार्यामुळेच ही परिषद यशस्वीरीत्या संपन्न झाली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### पक्ष्यांची गाणी

जैवविविधता व पर्यावरणाबद्दल समाजात जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय व HOPE नेचर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पक्षिप्रेमीं डॉ. शशिकुमार मेनन, Endocrinologist व संचालक टी. डी. एम. लॅबोरेटरी यांचे व्याख्यान २२ नोव्हेंबर २०१४ रोजी सायंकाळी ६ वाजता पतंजलि सभागृह, ठाणे महाविद्यालय संकुल येथे आयोजित करण्यात आले होते. त्यांनी पक्ष्यांच्या आवाजांबद्दल व गाण्यांबद्दल उद्बोधक माहिती दिली.

### संशोधक अविष्कार

मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन रिसर्च कनव्हेक्शन 'आविष्कार २०१४-१५' या स्पर्धेची ठाणे जिल्हास्तरीय फेरी विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर महाविद्यालयात दि.२५ नोव्हेंबर २०१४ ला पार पडली. त्यात विद्यार्थी, शिक्षक आदी विविध विभाग होते.

प्रत्येक विभागातील ५ उत्कृष्ट प्रकल्प विद्यापीठीय फेरीसाठी निवडण्यात आले. बा. ना. बांदोडकर महाविद्यालयातील तब्बल ७ मुलांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली.

पर्यावरणशास्त्राच्या निष्णात अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या दिशा राव या विद्यार्थिनीने Hydrobiological Study of Thane Creek हा प्रकल्प सादर केला. तसेच आदित्य छत्रे, अनिकेत बागुल आणि

हेंजल सलदां या जैवतंत्रज्ञान शाखेच्या मुलांनी Isolation & Indentification of LDPE degrading microorganisms from sewage samples हा प्रकल्प सादर केला. त्याशिवाय वैष्णवी सामंत, तनिष्का बागवे आणि दर्शना महाजन या जैवतंत्रज्ञान शाखेच्या मुलींनी Isolation & Indentification of novel agar digestor in earthworm (Eisenia fetida) gut हा प्रकल्प सादर केला. या सर्वांची विद्यापीठीय स्तरावर निवड झाली.

### ''उत्सव भारतीय संविधान दिनाचा''

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून २६ नोव्हेंबर २०१४ रोजी 'भारतीय संविधान दिन' साजरा करण्यात आला.या वेळी डॉ. स्वाती गाडगीळ यांच्या 'महिलाविषयक कायद्यांची जनजागृती' या व्याखानाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी डॉ. स्वाती गाडगीळ यांनी अनेक दाखले आणि उदाहरणे देत मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले. रोजच्या धकाधकीच्या जीवनात स्त्रियांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. अशा वेळी प्रसंगावधान कसे राखावे आणि वेळीच कायद्याचा वापर कसा आणि कुठे करावा याची सविस्तर माहिती त्यांनी दिली.

### ''महिला स्वसंरक्षणाचा पाठ''

ठाण्याच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात महिला सुरक्षा व स्वसंरक्षण या विषयावर एक मार्शल आर्ट, कराटे, ज्युडो व स्वसंरक्षण यांच्या कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात करण्यात आले. दि.२७ नोव्हें. २०१४ रोजी आयोजित केलेल्या या कार्यशाळेत ''मार्शल आर्ट आणि सांस्कृतिक समिती'', ठाणे या संस्थेचे अध्यक्ष श्री. निखिल रमाकर गुंडे यानी अकरावी ते पदवीच्या वर्गतील १५० विद्यार्थिनींसाठी मार्शल आर्टच्या द्वारे सरंक्षण कसे करावे याची प्रात्यक्षिकासह कार्यशाळा घेतली.

### २८ नोव्हेंबर महात्मा जोतिराव फुले स्मृतिदिन

दि.२८ नोव्हें.२०१४ या दिवशी क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून ''जीवनात यशस्वी कसे व्हावे?'' या व्याख्यानाचे आयोजन पतंजली सभागृहात करण्यात आले. प्रमुख वक्ते प्रा. श्री. कमलाकर इंदुलकर यांनी जोतिरावांचे कार्य आणि कर्तृत्व विद्यार्थ्यांना समजावत त्यांनी जीवनात यशस्वी कसे व्हावे याचेही मार्गदर्शन केले. २ तास चाललेल्या या व्याख्यानात विविध प्रश्न आणि त्यांची उकल करीत विद्यार्थ्यांनीही यामध्ये सहभाग घेतला.

### जागतिक एड्स दिन

१ डिसेंबर या दिवशी जिल्हा सामान्य रुग्णालय जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष ठाणे आणि बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या दिमाखात जागतिक एड्स डे साजरा करण्यात आला.

या प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना शपथ वाचून दाखवली. आकाशात फुगे उडवून प्रभातफेरीला प्रारंभ करण्यात आला. ही प्रभातफेरी जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे येथून निघाली ती कलेक्टर ऑफीसमार्गे बाजारपेठेतून बा. ना. बांदोडकर महाविद्यालयात येऊन विसर्जित करण्यात आली. पतंजली सभागृहात झालेल्या विषेश सभेत एड्सविषयी व्याख्याने व पथनाट्य यांचे सादरीकरण झाले. ह्याच दिवशी रक्तदान शिबिरही आयोजित करण्यात आले होते.

### करिअर संधीचा मेळावा

आजच्या स्पर्धात्मक वर्तमानात बांदोडकर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपल्यातील नैपुण्य ओळखून स्वतःचे भवितव्य घडविता यावे म्हणून दि.५ व ६ डिसेंबर असे दोन दिवस करिअर मेळाव्याचे आयोजन केले होते.

---

केवळ ज्ञान असून उपयोग नाही, ते कसं आणि केव्हा वापरायचं याचंही ज्ञान हवं.

सुरुवातीच्या पहिल्या सत्रात डॉ. रोहिदास वाघमारे. मुंबई जिल्हा रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन व प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांनी मुलांना वैद्यकीय व्यवसायातील किस्से सांगितले व त्यातील संधींची ओळख करून दिली.

त्यानंतर श्री. अनाहत हुल्याळकर यांनी कायदा व व्यवस्थापन क्षेत्रातील महत्त्वाच्या संधींचा उल्लेख केला व व्यवस्थापनातील संधी विद्यार्थ्यांना सांगितल्या. कु. अनघा बैल्लकूर यांनी परदेशातील वैद्यकीय शिक्षण यावर आपले विचार मांडले. ५ डिसेंबरच्या शेवटच्या सत्रात आंतरराष्ट्रीय कीर्तीचे श्री. कुश पांचाल यांनी 'योगशास्त्रातील करिअर संधी' या विषयावर व्याख्यान दिले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने अभिवादन करून करिअर मेळाव्याच्या दुसऱ्या सत्राला सुरवात झाली. श्री. जयप्रकाश भांडे हे 'डॉ. प्रकाश बाबा आमटे' या मराठी चित्रपटामुळे चर्चेत असणारे नाव आणि फिल्मी मायानगरीतील एक दिग्दर्शक व छायाचित्रकार. अमिताभ बच्चन पासून ते नाना पाटेकर यांच्यापर्यंत अनेक अभिनेत्यांना कॅमेऱ्याच्या फ्रेममध्ये बसविणारे व कथालेखनापासून ते फिल्म वितरणापर्यंत सर्वच क्षेत्रांतील माहिती ठेवणारे जयप्रकाश भांडे यानी विद्यार्थ्यांना चित्रनगरीमधील अनेक लहानमोठ्या संधींबदल माहिती दिली.

त्यानंतरच्या सत्रांत कॅप्टन एस. बिलग्रामी व शांतदेव द्विवेदी यांनी पायलट प्रशिक्षण व एव्हिएशन इंजीनिअरिंग यावर एक व्याख्यान दिले.

यानंतरच्या सत्रात डॉ. आठवले यांनी विज्ञानातील अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना देशविदेशातील कृषिविज्ञानातील संधीविषयी मार्गदर्शन केले.

शेवटी भारतीय स्टेट बँकेच्या अर्चना वैद्य व मुग्धा महाडिक या आधिकाऱ्यांनी Banking Loan for Higher Education यावर नवीन योजना व बँकेच्या सोयीसुविधा या विषयांना हात घालून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

अशा प्रकारे दरवर्षी भरणाऱ्या या करिअर मेळाव्याची ६ डिसेंबरच्या संध्याकाळी सांगता झाली.

**विद्यार्थ्यांसाठी यशाचा गुरुमंत्र**

''यश आणू या खेचून'' या Motivational Show चे आयोजन महाविद्यालयात बुधवार दिनांक १७ डिसेंबर २०१४ रोजी पतंजलि सभागृहात ठीक ३:०० वाजता करण्यात आले होते

महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग व उल्हासनगरच्या जायन्टस् ग्रुपच्या संयुक्त विद्यमाने या चैतन्यमय व्याख्यानाचे आयोजन केले होते. ''यश आणू या खेचून'' चे लेखक व सादरकर्ते श्री. चंद्रकांत पागे यांच्या या नवचैतन्य फुलविणाऱ्या व्याख्यानाचा आस्वाद घेण्यासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी आले होते.

**'माझे ग्रंथालय ग्रंथपेटी' कार्यक्रम**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात २० डिसेंबर २०१४ रोजी 'श्री. श्रीराम शिधये, निवत्त वरिष्ठ सहसंपादक, महाराष्ट्र टाइम्स' यांना आमंत्रित करण्यात आले होते.

श्री. श्रीराम शिधये यांनी वाचन कसे करावे या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले. पुस्तक हे माणसाला स्फूर्ती देण्याचे काम करते. प्रत्येक चांगले पुस्तक हे एक चांगला संदेश देणारे असते असे विचार त्यांनी मांडले. इतर देशांतील वाचनसंस्कृतीबद्दल त्यांनी प्रकाश टाकला. वाचनाचा आनंद हा अवर्णनीय असतो. इतिहास वाचल्याने त्या काळातील माहिती समजते. इतिहासाच्या आधाराने वर्तमान समजला जातो व भविष्याचे नियोजन करणे सोपे जाते असे मत त्यांनी व्यक्त केले. 'माझे ग्रंथालय ग्रंथपेटी' ह्या ठाणे शहरात सुरू असलेल्या स्तुत्य उपक्रमातर्फे सदर कार्यक्रम महाविद्यालयाने आयोजित केला होता.

बाह्यशत्रूपेक्षा बऱ्याच वेळी अंतःशत्रूचीच अधीक भीती असते.

## क्रीडास्पर्धा

महाविद्यालयाचे वार्षिक मैदानी क्रीडा खेळ २२ डिसेंबर २०१४ रोजी महाविद्यालयाच्या पटांगणात पार पडले. या विविध खेळांमध्ये ३७८ विद्यार्थी आणि १४५ शिक्षक व शिक्षकेतर सहकारी सहभागी झाले होते. महाविद्यालयाची General Championship तीन विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.

१) विशाल संजय मोरे, प्रथम वर्ष विज्ञान शाखा (पदवी महाविद्यालय)

२) दर्शना रामचंद्र पाटील, बारावी (कनिष्ठ महाविद्यालय)

३) विष्णवी विविक गेज्जी, अकरावी (कनिष्ठ व पदवी महाविद्यालय महिलांकरिता)

## ''रंगली निद्राराक्षसावर चर्चा''

जागर जाणिवांचा अभियानाअंतर्गत व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील महिला विकास कक्षाच्या सहकार्याने 'झोप', 'निद्रा' या विषयावर एका चर्चेचे आयोजन करण्यात आले. मुंबई विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय देशमुख व 'निद्रा' या विषयावर संशोधन केलेले डॉ. देशपांडे यांनी आपणांस किती वेळ निद्रेची गरज असते? कोणत्या वयात किती झोप आवश्यक आहे? झोप कोठे कोठे घेता येते? झोपण्याची योग्य पद्धत कोणती? झोप व स्वप्ने यांचा परस्परसंबंध किती खरा व किती खोटा इत्यादीबद्दल मार्गदर्शन केले.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ एम.लिब.शिबिर

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एम.लिब.अभ्यासक्रमाचे शिबिर २५ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१४ रोजी घेण्यात आले होते. या वेळी २५ विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प आराखडे व शोधनिबंध सादर केले.

## 'महाराष्ट्रातील नामशेष होणारे पक्षी'

महाराष्ट्रात विविध प्रकारची जैवविविधता आहे. त्याप्रमाणे विविध पक्षीदेखील संचार करत असतात. परंतु हल्ली वाढत्या कॉंक्रिटीकरणाने हे पक्षी दुर्मीळ होऊन नामशेष व्हायच्या मार्गावर आहेत.

अशा पक्ष्यांबद्दल अधिक माहिती देण्याकरता १३ डिसेंबर २०१४ रोजी बा. ना. बांदोडकर महाविद्यालयातील पतंजलि सभागृहात डॉ. राजू कसांबे, प्रोजेक्ट मॅनेजर, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी यांचे 'महाराष्ट्रातील नामशेष होणारे पक्षी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

## अभिनंदन

'कै. मृणालिनी जोगळेकर स्मृती' राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत कु. सोनाली निधाते हिला पाचवा क्रमांक विभागून मिळाला.

प्रा. प्रकाश माळी सरांना समाजसेवेबद्दल लेक लाडकी अभियानातर्फे बहुजन समाज पुरस्कार २०१५ प्राप्त झाला. तसेच त्यांनी सहशालेय कार्यक्रमांचे आयोजनः कार्यशाळा ह्या जिल्हा परिषद, ठाणे व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमात दि.६ जानेवारी २०१५ रोजी सहभाग घेतला.

प्रा. आकांक्षा शिंदे, गणित विभाग यांना ॲकॅडमिक स्टाफ कॉलेज, पुणे आयोजित ओरिएंटेशन कोर्समध्ये 'अ' श्रेणी मिळाली.

श्री. प्रमोद सावंत, ग्रंथालय विभाग यांनी झुनझुनवाला महाविद्यालय, घाटकोपर आयोजित एक आठवड्याचा ग्रंथालय कार्य व सेवा विषयीचा अभ्यास पूर्ण केला.

कु. केतकी जगदीश गोखले ह्या प्रथम वर्ष विज्ञानाच्या विद्यार्थिनीला जिम्नॅस्टिक्स फ्लोअर एक्झरसाईजमध्ये अखिल भारतीय स्तरावर ब्राँझ मेडल व

तिच्या मुंबई विद्यापीठ संघाला सिल्व्हर मेडल मिळाले.

**आकांक्षा महोत्सव**

ज्याची सर्वच स्तरातून वाट पाहिली जाते तो 'आकांक्षा' महोत्सव २०१४ या वेळी २३ व २४ डिसेंबर २०१४ रोजी बांदोडकर महाविद्यालयाच्या पटांगणात संपन्न झाला. दि. २३ डिसेंबर २०१४ या पहिल्या दिवशी आकांक्षाच्या औपचारिक उद्घाटनासाठी 'जय मल्हार' या टी.व्ही. मालिकेतील प्रियंका वामन व 'रेगे' या बहुचर्चित सुपरहिट मराठी चित्रपटातील 'शिटी वाजली' या गाजलेल्या गाण्याचे लेखक (गीतकार) व चित्रपटाचे पटकथालेखक, दिग्दर्शक श्री. अभिजित पानसे या दोन व्यक्ती लाभल्या होत्या. उद्घाटनानंतर लगेचच 'मि. बांदोडकर व मिस बांदोडकर ही मानाची व महत्वाची अष्टपैलू व्यक्तिमत्त्व कसोटी स्पर्धा (Personality Contest) घेण्यात आली. यामध्ये ५२ विद्यार्थ्यांमधून अंतिम स्पर्धेसाठी १३ स्पर्धक निवडले गेले. रंगमंचावरील सर्व फेऱ्यांमधून शेवटी मि. बांदोडकर म्हणून कु. अक्षय पाटील व मिस. बांदोडकर म्हणून कु. प्रणाली शेट्टी यांची विजेते म्हणून घोषणा झाली. यासाठी परिक्षक म्हणून दिग्दर्शक श्री. अभिजीत पानसे 'रेगे फेम' व प्रियंका वामन (जय मल्हार फेम) यांनी पद भूषविले. यानंतर समूह नृत्य (Group Dance) ची स्पर्धा सुरू झाली. यामध्येही विद्यार्थ्यांनी 'मुंबई मेरी जान' Retro ते Metro, बेटी बचाओ, स्त्री भ्रूण हत्या थांबवा, यासारख्या सामाजिक भावनेतून प्रेरित संकल्पना दर्शकांपर्यंत पोहोचविल्या व माध्यम म्हणून नृत्याचा उपयोग केला.

## तंत्रनिकेतन

**श्री. एस. एल. खाचणे सेवानिवृत्त**



वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनमधील श्री. एस. एल. खाचणे दि. ३१.१२.२०१४ रोजी २६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. श्री. खाचणे तंत्रनिकेतनच्या कार्यशाळा विभागात दि. १ एप्रिल १९८८ पासून Workshop Instructor या पदावर रुजू झाले होते.

कार्यशाळा हा कोणत्याही तंत्रशाळेचा अविभाज्य घटक मानला जातो. तंत्रनिकेतन म्हटले की त्या ठिकाणी तांत्रिक कौशल्ययुक्त विद्यार्थी घडवणे हे आलेच. त्यांनी तांत्रिक कौशल्ययुक्त विद्यार्थी घडविण्याच काम अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडले.

सरांचा स्वभाव शांत, मृदुभाषीक होता. विद्यार्थ्यांशी व इतर कर्मचारी वर्गाशी त्यांचे सौहार्दपूर्ण संबंध होते. धार्मिक वृत्तीकडे ओढा असलेले सर हे 'श्री स्वामी समर्थां'चे निस्सीम भक्त आहेत. तंत्रनिकेतनच्या भ्रमणमंडळाचे ते ज्येष्ठ सदस्य होते. जवळजवळ सात-आठ सहलीतं त्यांचा सहभाग होता.

अशासकीय शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी महासंघ-तंत्रनिकेतन ठाणे युनिट युनियनचे ते ज्येष्ठ सदस्य होते. युनियनतर्फे त्यांचा युनियनचे ज्येष्ठ सदस्य श्री. साहेबराव बोरसे यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी युनियनचे सदस्य हजर होते. श्री. हरिभाऊ दंडवते यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

तंत्रनिकेतनतर्फेही प्राचार्य दि. कृ. नायक यांनी शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देऊन यथोचित सत्कार केला. श्री. खाचणे सरांना पुढील आयुष्य आरोग्यपूर्ण आणि भरभराटीचे लाभो अशीच सदिच्छा!

**Faculty Meeting**

जानेवारी २०१५ च्या पहिल्या शनिवारी तंत्रनिकेतनच्या A.V. रूममध्ये Faculty Meeting चे आयोजन केले होते. Awareness of NBA विषयीची माहिती प्रा. श्री. आर. जी. करंदीकर (सोम्मया कॉलेज, मुंबई) यांनी उपस्थितांना करून दिली. सदर कार्यक्रम ३ जानेवारी २०१५ रोजी दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत पार पडला.

(पृष्ठ २ वरून - **संपादकीय**)

झाला. डार्विनचा उत्क्रांतिवाद (Evolution), मेंडेलचा आनुवंशिकतावाद यांमुळे जीवविज्ञानाला एक वेगळी दृष्टीच प्राप्त झाली. यातला सर्वांत महत्त्वाचा पुढचा टप्पा म्हणजे १९५२ साली वॅटसन (Watson) आणि क्रिक (Crick) यांनी डीएनए (DNA) च्या रचनेची केलेली उकल. जैवविज्ञानाला ही एक नवीन संजीवनीच होती. यामुळेच जैवयांत्रिकी ही एक नवी शाखा विकसित व्हायला लागली. पुरुष आणि स्त्रियांच्या जननक्षम गंतुकांचा खेळ यामुळेच कल्पनेची परिसीमा गाठू लागला.

प्रजननक्षमता ही माणसाची नैसर्गिक देणगी असली तरी अनेक पुरुष आणि स्त्री हे प्रजननक्षम नसतात. त्याची कारणे अनेक असली तरी त्याचे मुख्य कारण हे त्यांच्या प्रजननक्षम पेशींमध्ये असलेले दोष हेच असते. यातली सर्वांत मोठी क्रांती १९७८ साली डॉ. स्ट्रप्टो (Strepto) आणि डॉ. एडवर्ड (Edwards) यांनी स्त्रीबीज म्हणजे 'अंदुक' आणि पुरुषबीज म्हणजे 'रेतुक' यांचे शरीराबाहेर मीलन घडवून 'कृत्रिम' गर्भधारणा यशस्वी केली. या गर्भाचे आईच्या पोटामध्ये रोपण करण्यात आले आणि नऊ महिन्यांनी 'लुईस ब्राउन' (Louise Brown) ही कन्या जन्माला आली. या ३६ वर्षांत सुमारे पन्नास लाख वंध्यत्व असलेल्या जोडप्यांनी या तंत्रज्ञानामुळे अपत्यांना जन्म दिला. लुईस ब्राउन हिलाही नुकतेच एक अपत्य झाले. अर्थातच वैद्यकशास्त्रामधला हा एक मोठा विजय असला तरी यामुळे अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक प्रश्न आणि शंका निर्माण होऊ लागल्या. पाश्चात्त्य देशांमध्ये ख्रिस्ती धर्माचा याला कडाडून विरोध होता आणि आजही आहे. अशा कृत्रिम फलधारणेमुळे उत्क्रांतिप्रक्रियेवर तसेच या प्रक्रियेतून जन्माला आलेल्या पिढीवर काय परिणाम होतील याचे अंदाज आजही चर्चेचाच विषय आहेत. अनेक शास्त्रज्ञांनी या संदर्भात या तंत्रज्ञानाचा वापर अधिक संयमाने आणि विचारांनी व्हायला पाहिजे असे सांगून ठेवले आहे.


या वादविवादामुळेच आणि यामुळे निर्माण होणाऱ्या सांस्कृतिक संदर्भांमुळे इंग्लंडमध्ये तंत्रज्ञानाच्या साहाय्याने होणाऱ्या प्रजोत्पादनावर (Assited Reproductive Technologies - ART) नियंत्रण ठेवण्याकरता 'मानवी गर्भधारणा आणि गर्भविज्ञान देखरेख मंडळां'ची (Human Fertilization and Embroloey Authority - HFEA) १९९० साली स्थापना झाली. वैज्ञानिकांबरोबरच, धर्मप्रसारक आणि समाजशास्त्रज्ञांचाही त्यात समावेश झाला. अमेरिका आणि युरोपमधील अनेक देशांमध्येही या प्रकियेवर लक्ष ठेवण्याकरता देखरेख मंडळे स्थापन झाली. याची साधकबाधक चर्चा समाजाच्या सगळ्यांच थरांत होऊ लागल्यामुळे या तंत्रज्ञानाच्या वापरावर काही प्रमाणात निर्बंधही आले. अशा कृत्रिम गर्भधारणेतून निर्माण केलेल्या १४ दिवसांच्या गर्भपेशींवरच संशोधन करणे यामुळे बंधनकारक झाले. पण वैज्ञानिकांचे समाधान यामुळे होत नव्हते. या प्रकियेतून एकाच वेळी अनेक गर्भ निर्माण केले जातात. असे गर्भ एकतर पुढील संशोधनाकरता वापरले जाऊ लागले किंवा शीतपेटीमध्ये त्यांचे जतन व्हायला लागले. एखाद्या जोडप्याने असा गर्भ जतन करून ठेवला आणि दुर्दैवाने या जोडप्यातील एखाद्याचे निधन झाले किंवा कर्करोगामुळे त्यांची जननक्षमता खंडित झाली, तर आपल्या आधी गोठविलेल्या गर्भाचे भाडोत्री आईमध्ये रोपण करून अपत्य प्राप्त करून घेणे यामुळे शक्य झाले. समलिंगी जोडप्यांना भाडोत्री किंवा गरजेची गंतुके दान म्हणून मिळू लागली. गंतुकांचा सगळाच व्यवहार हा एका यंत्राच्या जुळणीसारखाच बनून गेला.

या प्रगतीचा पुढचा टप्पा म्हणजे १९९७ साली प्रतिरूपण (Clonning) प्रक्रियेतून झालेला 'डॉली' या मेंढीचा जन्म. आयन विल्मूट या एडिंबरो, स्कॉटलंडमधील रोझलिन इंन्स्टिट्यूटच्या शास्त्रज्ञांनी ही किमया करून दाखविली. नैसर्गिक किंवा कृत्रिम गर्भधारणेकरता अंदुक (स्त्रीबीज) आणि रेतुक (पुरुषबीज) यांची गरज लागते.

---

दुःखातील दुःखिताला सुख म्हणजे त्याच्या दुःखातला सहभाग होय.

प्रतिरूपण (Clonning) पद्धतीमुळे ही गर्भधारणा अलैंगिक पद्धतीने करण्यात येते. डॉलीच्या निर्मितीकरता एका मेंढीचे अंदुक घेण्यात आले. त्याचे प्रकल म्हणजे पेशीकेंद्र (Nucleus) काढण्यात आले. दुसऱ्या एका मेंढीच्या आचळातील प्रकल काढून पहिल्या मेंढीच्या अंदुकपेशींमध्ये त्याचे रोपण करण्यात आले. या पेशीला बाहेरून उत्तेजित करण्यात आले आणि पेशीविभाजन सुरू होऊन गर्भनिर्मितीची प्रक्रिया चालू झाली. जननप्रक्रियेमधील बाह्य हस्तक्षेपाचा हा परमोच्च बिंदू होता. निर्मिती किंवा जननाच्या मूलभूत सिद्धांतालाच यामुळे धक्के बसले. कविकल्पनेपेक्षाही ही घटना अघटित होती. अर्थातच यामुळे समाजातल्या सगळ्याच क्षेत्रांतून याला विरोध झाला. या विरोधाचे प्रमुख कारण, प्राण्यांमधील प्रतिरूपणापेक्षा, मानवामध्ये ह्याच माध्यमातून संततिनिर्मितीच्या शक्यतेसाठी अधिक होते. अमेरिकेपासून जवळजवळ सर्वच राष्ट्रांनी या संशोधनाकरता सरकारी पैसे मिळणार नाहीत म्हणून जाहीर केले, आणि बहुतेक राष्ट्रांमध्ये ही बंदी आजही लागू आहे. डॉलीला जन्म देणाऱ्या रोझलिन इन्स्टिट्यूटमधल्या याच वैज्ञानिकांनी पुन्हा एकदा प्रकल (Nucleus) अदलाबदलीचे नवीन तंत्रज्ञान वापरून ‘पॉली’ या आणखी एका मेंढीला जन्माला घातले. या सर्वच संशोधनावर



'दिशा'च्या मार्च १९९७ आणि जानेवारी १९९८ च्या संपादकीयांमध्ये विस्तृतपणे माहिती देण्यात आली आहे.

प्रतिरूपणामुळे (Clonning) उत्तेजित झालेल्या वैज्ञानिकांनी नवीन नवीन कल्पना विकसित करायला सुरुवात केली. २००० ते २००५ पर्यंत मानवी जनुकांचा नकाशा समजून घेण्यात शास्त्रज्ञांना यश आले. चिंपांझीपासून अशा अनेक प्राण्यांचे नकाशे तयार होऊ लागले. अनेक रोग हे जन्मजात आणि आनुवंशिक असतात हे वैद्यकशास्त्राला माहीत होते. अशा अपत्याच्या गर्भधारणेआधीच त्याला जबाबदार असलेले दोष स्त्री किंवा पुरुष गंतुकांतून काढता येतील का, याचा अभ्यास शास्त्रज्ञांनी चालू केला. सर्वसाधारणपणे गर्भधारणेकरता एक आई आणि एक वडील अशी गरज असते. पण प्राण्यांवर प्रयोग करून दोन आया आणि एक वडील अशा तीन व्यक्तींनी मिळून अपत्यनिर्मितीची शक्यता शास्त्रज्ञांनी नुकतीच सिद्ध करून दाखविली. मानवावरील याच प्रयोगांना इंग्लंडमधील दोन्ही सभागृहांनी याच महिन्यात परवानगी दिली आणि सर्व कायदेशीर बाबी जर कुठलाही शास्त्रज्ञ पुऱ्या करू शकला, तर २०१६ पर्यंत असे मानवी अपत्य जन्माला येण्याची शक्यता आता निर्माण झाली आहे.

आनुवंशिकतेमुळे काही रोग हे आईकडून अपत्यामध्ये येतात. पेशींच्या प्रकलामध्ये (Nucleus) जसे डीएनए असतात तसेच कलकणू (Mitochondria) मध्येही डीएनएचे कण असतात. कलकणू हे पेशीचे महत्त्वाचे अंग असून अन्नाद्वारे पेशीला ऊर्जा पुरविण्याचे महत्त्वाचे काम कलकणू करते. स्त्रीबीज म्हणजे अंडुकपेशीमधील कलकणू (Mitochondria) मधील काही जनुकांच्या जनुकोत्परिवर्तनामुळे (Mutation) हे दोष निर्माण होतात. पाच हजारांमध्ये एक व्यक्ती अशा दोषांमुळे बाधित असू शकते. कलकणू (Mitochondria) हे फक्त आईकडूनच नवीन बाळामध्ये संक्रमित होत असतात. आईच्या अंडुकातील बाधित कलकणू (Mitochondria) काढून दुसऱ्या स्त्रीच्या अंडुकातील अबाधित कलकणूंचे रोपण आता यशस्वीरीत्या करण्यात येऊ शकते, आणि पुरुषांच्या रेतुकांशी यांचा संयोग करून नवीन चांगले अपत्य निर्माण होऊ शकते. सध्या हा प्रयोग जरी उंदरांवरतीच शक्य असला तरी मानवामध्येही तसाच प्रयोग यशस्वी होण्याची खातरी आहे. इंग्लंमधील न्यूकॅसल विद्यापीठात (Newcastle University) सध्या यावर संशोधन चालू आहे.

प्रतिरूपण (Clonning) काय किंवा कलकणूंचे रोपण करून तीन व्यक्तींनी निर्माण केलेले अपत्य काय, यामुळे अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक प्रश्न निर्माण होण्याची भीतीच अभ्यासक व्यक्त करीत आहेत. धर्माचा याला असलेला विरोध हा वेगळ्या कारणांमुळे असला तरी वैज्ञानिकही या प्रकियेबद्दल फारसे समाधानी नाहीत. यातील मुख्य आक्षेप हा या सर्वच बदलांमुळे होणाऱ्या विपरीत परिणामांचे दृश्य रूप समजायला कदाचित काही शतके लागण्याची शक्यताही आहे. शिवाय या सगळ्याच संशोधनाचा आर्थिक, सामाजिक गैरवापर होण्याचीही फार मोठी भीती आहे. म्हणूनच अशा प्रयोगांचे स्वागत करताना अशा उपायांचा संयमित वापर करणे हेच अधिक हितकारक ठरणार आहे.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

* *अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा*
* *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
* *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.